वर्ष : १४६

Registered No. PCW/002/2024-2026-S.P.College Post-RNI No. 1755/1957

# केसरी

राष्ट्रीय ठेवा

• अंक २८२ • पृष्ठे : १२+नव्या दिशा पुरवणी • सात रुपये • बुधवार १४ ऑक्टोबर २०२६, पुणे C (पुणे/अहिल्यानगर/सोलापूर आवृत्ती) Issue-282 • Pages 16 • Seven Rupees • 14 October 2026 • Pune

### साहित्यसम्राट न. चिं. केळकर यांची आज पुण्यतिथी



**सायं. ५ :** केसरी–मराठा संस्थेच्यावतीने वनश्री वनकर यांच्या 'बाभळीच्या बाया' पुस्तकाचा 'कै. न. चिं. केळकर ग्रंथोत्तेजक' पारितोषिकाने सन्मान.
**हस्ते :** डॉ. गीताली टिळक
**स्थळ :** लोकमान्य सभागृह, केसरीवाडा.

### केंद्रीय राज्यमंत्री मुरगन यांचा राजीनामा

**नवी दिल्ली :** केंद्रीय राज्यमंत्री एल. मुरगन यांनी मंगळवारी पदाचा राजीनामा दिला. तामिळनाडूतील भाजपला बळकट करण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या राजीनाम्यामुळे केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदलाचे संकेत मिळत असल्याचे वृत्त आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिलेल्या पत्रात मुरगन यांनी म्हटले आहे की, मी माहिती आणि प्रसारण व संसदीय व्यवहार राज्यमंत्री पदाचा राजीनामा देत आहे. देशाची सेवा आणि तामिळनाडूचे नेतृत्व करण्याची संधी दिल्याबद्दल मी आभारी आहे तसेच, मला राज्यसभेचे सदस्यत्व सोडण्याची परवानगी द्यावी.



आजचा रंग : निळा । उद्याचा रंग : पिवळा

**रूप :** कुष्मांडा । **छायाचित्र :** चेतना गवळी
**छायाचित्रकार :** स्वप्नील रास्ते
**स्थळ :** टॅलेंट स्काऊट स्टुडिओज

# लढा सुरूच राहील : राहुल

## 'इंडिया' आघाडी आणि संघटनांचा निर्धार



**नवी दिल्ली :** लोकशाही वाचविण्यासाठी विविध राजकीय पक्ष, विद्यार्थी संघटना आणि जनता रस्त्यावर उतरली आहे. मतचोरी करणाऱ्यांना जोपर्यंत शिक्षा होणार नाही, तोपर्यंत जनतेचा हा लढा सुरूच राहील, असा निर्धार 'इंडिया' आघाडी आणि सामाजिक संघटनांनी केला आहे. राजकीय आणि सामाजिक अशा दोन्ही स्तरांवर हा लढा सुरूच राहील आणि आम्ही त्यात नक्कीच विजयी होऊ, असे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मंगळवारी सांगितले.

राहुल गांधी यांनी काल आपल्या निवासस्थानी 'इंडिया' आघाडीचे नेते, विद्यार्थी संघटना आणि समाजातील प्रतिष्ठित नागरिकांसाठी चहापानाचे आयोजन केले होते. त्यानंतर, आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर राहुल यांनी यावेळी जोरदार टीकास्त्र सोडले. मतांची चोरी करणाऱ्यांना कायद्याच्या कचाट्यात आणले जाईल आणि त्यांना कठोर शिक्षा मिळवून दिली जाईल, असे राहुल म्हणाले. राज्यघटनेवर आणि कायद्यावर आमचा विश्वास असल्याचे सांगताना राहुल यांनी सर्वोच्च न्यायालय आणि सरन्यायाधीशांबद्दल आदर व्यक्त करतानाच ते योग्य भूमिका बजावतील, अशी आशादेखील व्यक्त केली. पण, त्याचवेळी कोणतीही संस्था भूमिका बजावो अथवा न बजावो; राजकीय विरोध सुरूच राहील. जनतेचा विरोध सुरूच राहील आणि विजय आमचाच होईल, असेही राहुल म्हणाले.

मतचोरीचे मुख्य सूत्रधार मोदी असून शहा आणि ज्ञानेश कुमार त्याची अंमलबजावणी करत असल्याचा आरोपही राहुल यांनी यावेळी केला. या सर्वांभोवती कायदेशीर फास आवळला जात असून, त्यांना लवकरच कायद्याच्या कचाट्यात आणले जाईल, असा दावादेखील त्यांनी व्यक्त केला.

सर्वोच्च न्यायालयावर काढण्यात आलेल्या मोर्चात आणि इतर आंदोलनात सहभागी झाल्याबद्दल राहुल यांनी जनतेचे आभार मानले. राहुल यांच्या ५, सुनेहरी बाग रोड येथील निवासस्थानी चहापानाचा कार्यक्रम आणि पुढील व्यूहरचना ठरली. या चहापानाच्या कार्यक्रमास काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या प्रमुख सोनिया गांधी, काँग्रेस नेते के. सी. वेणुगोपाल, जयराम रमेश, शशी थरूर, पवन खेडा यांसह आरजेडीचे तेजस्वी यादव आणि मनोज झा, महुआ माझी (जेएमएम), हरेंद्र मलिक, आनंद भदौरिया (समाजवादी पक्ष), एम. ए. बेबी (सीपीआय–एम), डी. राजा आणि पी. संतोष कुमार (सीपीआय), 'एआयएसएफ' संघटनेच्या प्रमुख नेहा बोरा, दीपांकर भट्टाचार्य (सीपीआय–एमएल) आणि महुआ मोईत्रा (टीएमसी) आदी उपस्थित होते.

## पुन्हा एकदा दारुण पराभवासाठी तयार राहा

### शहा यांची जोरदार टीका



**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात विरोधी पक्षांनी केलेल्या निदर्शनांवरून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. देशातील जनता भाजप, एनडीए आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाठीशी असून २०२९ मध्ये पुन्हा एकदा दारुण पराभवासाठी विरोधकांनी तयार राहावे, अशा शब्दांत शहा यांनी विरोधकांना प्रत्युत्तर दिले.

काँग्रेसला नकारात्मक राजकारणाचा काहीही फायदा होणार नाही. या उलट, त्यांनी जनतेला समजून घेतले पाहिजे, त्यांच्याशी थेट संपर्क साधला पाहिजे, असेही शहा यांनी नमूद केले.

२०२९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) प्रचंड बहुमताने विजयी होईल आणि काँग्रेसला सलग चौथ्यांदा पराभवाचा सामना करावा लागेल, असेही शहा यावेळी म्हणाले.

देशातील जनता नरेंद्र मोदी, भाजप आणि एनडीएच्या पाठीशी असून, विरोधकही हे सत्य नाकारू शकत नाही, असेही शहा म्हणाले.

## सौरव दास, आशुतोष रांका पुन्हा पोलिसांच्या ताब्यात

### जंतर–मंतरवर पोहोचताच कारवाई

**नवी दिल्ली :** कडक सुरक्षा व्यवस्था आणि बॅरिकेड्स असतानाही पोलिसांना चकवा देत कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) नेते सौरव दास आणि आशुतोष रांका मंगळवारी जंतर–मंतरवर पोहोचले. त्यानंतर, दिल्ली पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले, अशी माहिती सीजेपीने दिली आहे.

सीजेपीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी याबाबतची माहिती 'एक्स'वरील पोस्टच्या माध्यमातून दिली. अजिंक्य शिंदे यांसह पक्षाच्या इतर सदस्यांनाही ताब्यात घेण्यात आले आहे, असे दिपके यांनी म्हटले आहे. तिरंगा हाती घेतलेले सीजेपीचे कार्यकर्ते काल पहाटे जंतर–मंतरवर पोहोचले. त्यानंतर, दिल्ली पोलिसांनी रांका, दास आणि शिंदे यांसह इतर सदस्यांना ताब्यात घेतले, असे दिपके यांनी म्हटले आहे. तुम्ही आंदोलनाचा हक्क हिरावून घेऊ शकत नाही, असे दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना उद्देशून म्हटले आहे. तसेच, एक चित्रफीत शेअर केली आहे. यामध्ये सीजेपीचे कार्यकर्ते सुरक्षा कडे तोडून जंतर–मंतरवर पोहोचल्याचे आणि भारत माता की जय अशा घोषणा देताना दिसतात. सीजेपीचे कार्यकर्ते जंतर–मंतरवर पोहोचताच पोलिसांची धावपळदेखील पाहायला मिळते.

आंदोलनचा हक्क बजावण्यासाठी आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी आम्ही जंतर–मंतरवर आलो होतो, असे रांका यांनी सांगितले. तसेच, कोणत्याही परिस्थितीत आम्ही ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा घेऊ, असेही ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्रालयाने नुकतीच जंतर–मंतरची अधिकृत आंदोलन स्थळ म्हणून असणारी मान्यता रद्द केली असून, रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी मैदान ही तीन ठिकाणे यापुढे आंदोलनासाठी उपलब्ध असणार आहेत. जंतर–मंतरवरील निर्बंधांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत यांनी, आमचे जंतर–मंतर हिरावून घेणारे गृह मंत्रालय कोण आहे? हे आंदोलनासाठी निश्चित केलेले ठिकाण असून आम्ही जंतर–मंतरवरूनच ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा मिळवू, असे सांगितले. तसेच, राज्यघटनेची प्रत दाखवली. राज्यघटना आमच्या सोबत असून घोषणादेखील दिल्या.

## अर्जात अनेक त्रुटी; सुनावणी अडली

**नवी दिल्ली :** मतदारांची विशेष तीव्र पडताळणी (एसआयआर) आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयावर काढण्यात आलेल्या 'चलो दिल्ली–लोकशाहीसाठी मोर्चा'नंतर काँग्रेस नेते राहुल गांधी आणि विरोधी पक्षांच्या १० प्रमुख नेत्यांनी दाखल केलेल्या अर्जावर मंगळवारी सुनावणी होऊ शकली नाही. कारण, न्यायालयाच्या रजिस्ट्रीने निदर्शनास आणून दिलेल्या त्रुटींची अद्याप पूर्तता झालेली नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावरील माहितीनुसार, न्यायालयाच्या रजिस्ट्रीने अर्जात १४ त्रुटी दाखविल्या होत्या. यामध्ये सहअर्जदार काँग्रेस अध्यक्ष आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या ओळखपत्राची स्पष्ट प्रत नसणे, काही पाने वाचता न येण्याजोगी असणे किंवा काही पाने गहाळ असणे असा बाबींचा समावेश होता. मुख्य निवडणूक आयुक्त आणि निवडणूक आयोगाशी संबंधित मुद्दे, विद्यार्थ्यांवरील अटकेची कारवाई, मेट्रो स्थानके बंद करणे आणि रेल्वे गाड्या रद्द करणे यासंदर्भात निवेदन सादर करण्यासाठी राहुल गांधी यांनी सर न्यायाधीश सूर्य कांत यांनी भेटीची वेळ मागितली होती. त्यावर, सरन्यायाधीशांनी अर्ज दाखल करण्याचा सल्ला आम्ही तातडीने सुनावणी घेऊ असे म्हटले होते.

दरम्यान, विरोधकांनी दाखल केलेल्या अर्जात १४ त्रूटी आढळल्या आहेत. या त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर हे प्रकरण सुनावणीसाठी सूचिबद्ध केले जाणार आहे.

राहुल गांधी, खर्गे यांसह तृणमूलचे खासदार सौगत रॉय, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव, राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी प्रसाद यादव, राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) नेत्या सुप्रिया सुळे, ठाकरे गटाचे नेते संजय राऊत, भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे डी. राजा, झारखंड मुक्ती मोर्चाच्या खासदार महुआ माझी, सीपीआय(एम)चे सरचिटणीस एम. ए. बेबी आणि इंडियन युनियन मुस्लिम लीगचे नेते ई. टी. यांनी हा अर्ज दाखल केला आहे. एसआयआरशी संबंधित सर्व नोंदी सादर करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाला द्यावे, एसआयआरच्या निर्णयांच्या वैधतेची तपासणी केली जावी, कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी, ऑनलाइन फॉर्म–६ नियमांनुसार जुळवून घेण्याचे निर्देश द्यावेत, एसआयआरमधील गैरप्रकारांची स्वतंत्र समितीमार्फत चौकशी करावी, अशा मागण्या विरोधकांमार्फत अर्जात करण्यात आल्या आहेत.

## ममता बॅनर्जी यांच्यावर चाकू हल्ला

**कोलकाता :** पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या प्रमुख ममता बॅनर्जी मंगळवारी कालीघाट येथील दुर्गा पूजा मंडपाचे उद्घाटन करण्यासाठी जात असताना अनोळखी महिलेने त्यांच्यावर चाकू हल्ला करण्याचा प्रयत्न केला.

ममता रस्त्यावरून चालत जात असताना अनोळखी महिला अचानक त्यांच्यासमोर आली. तिने ममता यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. हल्लेखोर महिलेच्या हातात चाकू होता आणि तिने ममता यांच्या पायावर वार करण्याचा प्रयत्न केला. हा संपूर्ण प्रकार पूर्वानियोजित कट असल्याचा संशय कुणाल घोष यांनी व्यक्त केला आहे.



नवरात्रोत्सवाच्या तिसऱ्या माळेला मंगळवारी करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची भीमादेवी रूपातील अलंकार पूजा बांधण्यात आली. ही पूजा अजिंक्य मुनीश्वर, वेदांग मुनीश्वर, सोहम मुनीश्वर आणि रवी माईनकर यांनी बांधली.

### पुस्तक वाचनातून समाजात शहाणपणाची पेरणी

शिक्षणबोध
पान ४

### गरज की स्वार्थ?

अग्रलेख पान ४

### जाता जाता – गणेश काटकर




अरे, जरासा दुष्काळ पडला तर तुम्ही ''राष्ट्रहित प्रथम'', हे विसरून गेलात?

## विठ्ठल आणि रूक्मिणी मातेस पारंपरिक पोषाखासह अलंकार

**पंढरपूर, (वार्ताहर) :** नवरात्र महोत्सवासानिमित्त दरवर्षी प्रथा परंपरेप्रमाणे श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपरिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येतात. मंगळवारी रूक्मिणी मातेस तुळजाभवानी पोषाखासह अलंकार परिधान करण्यात आला, अशी माहिती मंदिर समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.



रूक्मिणी मातेस सोन्याचा मुकुट, कर्णफुले जोड, जडावाचा हार, नवरत्नाचा हार, जडावाचे बाजूबंद जोड, खड्यांची वेणी, चिंचपेटी हिरवी, पानड्यांचा हार, तन्मणी मोठा, जवेची माळ, ठुशी, सरी, सोन्या मोत्याचे चांदवड, सूर्य पेठेची बिंदी, मण्या मोत्याच्या पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसूत्र, मत्स्य जोड, पैंजणजोड, कंबरपट्टा, वाक्या जोड आदी अलंकार परिधान करण्यात आले. तसेच श्री विठ्ठलास प्रभावळीसह नक्षी टोप, नाम हिऱ्याचा, कौस्तुभ मणी, दंडपेट्या जोड, हिऱ्याचे कंगन जोड, मोत्याचा तुरा, मस्त्य जोड, चंद्रहार १५ पदरी, पट्टीसहल लॉकेट, अष्टपैलू मण्यांची कंठी आठ पदरी, अष्टपैलू मनाची कंठी तीन पदरी, पदकासह लॉकेट नऊ पदरी, लॉकेट पाच पदरी, चंद्रहार, तोडेजोड आदी अलंकार परिधान करण्यात आले. राधिका मातेस सिद्धेश्वर टोप, ठुशी, पुतळ्यांची माळ, हायकोल, जवेची माळ, लक्ष्मीहार व सत्यभामादेवीला नक्षी टोप, हायकोल, जवेची माळ, जवमानी पदक, महालक्ष्मी मातेस सोन्याचे गंठण, एकदाणी दंड पेट्या जोड, (पान ५ वर)

## दहशतवाद्यांचा तळ उद्ध्वस्त

**जम्मू :** जम्मू–काश्मीरच्या पुंछ जिल्ह्यातील सुरनकोट परिसरात दहशतवाद्यांचा तळ मंगळवारी उद्ध्वस्त करण्यात आला. तसेच, एके–४७, हातगोळे आणि दारूगोळा जप्त करण्यात आला, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली. या भागात संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर लष्कर आणि पोलिसांनी सथरबन जंगलात संयुक्त मोहीम राबवली आणि शस्त्रसाठा हस्तगत केला, असेही ते म्हणाले.

घटनास्थळावरून एक एके–४७ रायफल, एक मॅगझिन, ३० काडतुसे, सहा हातगोळे, दारूगोळा आणि काही वैद्यकीय साहित्य जप्त करण्यात आले. दरम्यान, उधमपूर आणि कठुआ जिल्ह्याच्या सीमावर्ती भागात मजलता आणि बिल्लावर येथील डोंगराळ भागात संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यानंतर शोध मोहीम हाती घेण्यात आली असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. सोमवारी सायंकाळपासून लष्कराचे जवान आणि पोलिस संयुक्त मोहिमेद्वारे उधमपूरमधील मजलता भागातील सोन, खुबन, चोर आणि नागान तसेच कठुआ जिल्ह्यातील सद्रौता, भेद आणि बलोर परिसरातील जंगल परिसराची तपासणी करत आहेत. आतापर्यंत संशयितांशी कोणताही संपर्क झालेला नाही, असेही त्यांनी नमूद केले.



# ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार कराव्यात

## नंदन निलेकणी यांनी सुचविला उपाय

**नवी दिल्ली** : प्रश्नपत्रिकांचा एक मोठा साठा (बँक) तयार करणे आणि त्या विशिष्ट दिवसासाठी ऐनवेळी प्रश्नपत्रिका तयार केल्यास प्रश्नपत्रिका फुटण्याचा धोका कमी होईल, असा उपाय सहा सदस्यांच्या उच्च-स्तरीय कार्यगटाचे प्रमुख नंदन निलेकणी यांनी सूचविला आहे.

ब्लूमबर्ग न्यू इकॉनॉमी फोरम २०२६ मध्ये ते बोलत होते. ते म्हणाले, आपल्याला 'एक' निश्चित प्रश्नपत्रिकेची गरज का आहे? कारण ज्या क्षणी 'एक' प्रश्नपत्रिका अस्तित्वात येते, तेव्हा ती विकली जाण्याची किंवा तत्सम गैरप्रकार होतो आणि आर्थिक लाभ मिळवण्याची इतरांना संधी निर्माण होते. त्यामुळे यावर उपाय म्हणजे प्रश्नपत्रिकांचा एक प्रचंड साठा तयार करणे आणि केवळ ऐनवेळी त्या दिवसाची प्रश्नपत्रिका तयार करणे. अशा प्रकारे, प्रश्नपत्रिका आधीच बाहेर जात नाहीत आणि त्यामुळे आर्थिक लाभाची कोणतीही संधी उरत नाही.



नीटची प्रश्नपत्रिका फुटल्या प्रकरणी जंतर- मंतररन-ी; विद्यार्थ्यांच्या मोठ्या आंदोलनानंतर २५ जुलै रोजी धर्मेंद्र प्रधान यांनी केंद्रीय शिक्षण मंत्रीपदाचा राजीनामा दिला होता; त्यानंतरच्या दुसऱ्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या सहा सदस्यांच्या उच्च-स्तरीय कार्यगटाची घोषणा केली. या समितीला आपला अहवाल सादर करण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. निलेकणी यांनी अहवालातील तपशील उघड केला नाही, तरीही त्यांनी सांगितले की पंतप्रधान त्यांच्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास अत्यंत उत्सुक आहेत. संगणक-आधारित परीक्षांसाठीच्या केंद्रांची संख्या वाढवली पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले.संगणक-आधारित परीक्षा कशा घेतल्या जातील हे सुनिश्चित करणे, परीक्षा केंद्रांचे जाळे आवश्यक आहे. सध्या आपल्याकडे १ लाख ५० हजार केंद्रे आहेत. या संख्येत वाढ करणे गरजेचे आहे. हे प्रणालीशी संबंधित मुद्दे असून आमची समिती विचार करेल आणि मला वाटते की पंतप्रधान आमच्या सूचनांची अंमलबजावणी करण्यास खूप उत्सुक आहेत, असे ते म्हणाले.

ते म्हणाले, जर प्रश्नपत्रिका फुटण्याच्या समस्येकडे पद्धतशीरपणे पाहिले आणि तिच्या मूळ कारणांचा शोध घेतला, तर ही समस्या नक्कीच सोडवता येण्यासारखी आहे. परीक्षेच्या दिवशीच 'एआय' द्वारे आपोआप प्रश्नपत्रिका तयार केल्या जाण्याची कल्पना त्यांनी केली आहे का, असे विचारले असता ते म्हणाले, हो, नक्कीच. 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी'मधील सुधारणा आणि ती संस्था बळकट करण्याबाबतच्या संसदीय समितीच्या अलीकडील अहवालातही अशी शिफारस करण्यात आली आहे.



### जेएनयूमधील अत्याचार प्रकरण

# प्राध्यापक, काँग्रेस खासदाराला लोकसभेतून निलंबित करा

### भाजपच्या महिला खासदारांची राष्ट्रपती मुर्मू यांच्याकडे मागणी

**नवी दिल्ली** : जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील (जेएनयू) मधील ११ विद्यार्थिनींचा लैंगिक छळ केल्याप्रकरणी प्राध्यापक आणि मणिपूरचे काँग्रेसचे खासदार अंगोमचा बिमोल अकोइजम यांना लोकसभेतून निलंबित करावे, अशी मागणी भाजपच्या महिला खासदारांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे मंगळवारी केली. या प्रकरणी मुर्मू यांनी हस्तक्षेप करावा, अशी मागणी देखील त्यांनी केली.

भाजपच्या १५ महिला खासदारांच्या शिष्टमंडळाने राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेतल्यानंतर भाजप महिला मोर्चाच्या अध्यक्षा रूप कुमारी चौधरी यांनी सांगितले की, अकोइजम त्यांच्याविरोधात तक्रार दिलेल्या विद्यार्थिनींना सुरक्षा द्यावी, अशी विनंतीही शिष्टमंडळाने मुर्मू यांच्याकडे केली. त्या म्हणाल्या, प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन मुर्मू यांनी दिले.

दरम्यान, जेएनयूमधील घटनेत मणिपूरचे काँग्रेस खासदार प्राध्यापक बिमोल अकोइजम यांच्याविरोधात ११ तरुणींनी कथित गैरवर्तनाबाबत लेखी तक्रार दाखल केली होती. समितीच्या चौकशीत ते दोषी ठरले होते. त्यांना पदावरून बडतर्फही केले होते. काँग्रेस नेते राहुल गांधी, प्रियांका गांधी वाड्रा आणि सोनिया गांधी यांनी महिलांच्या सन्मानासाठी कटिबद्ध असल्याचा दावा केला होता; मात्र या प्रकरणी त्यांनी मौन पाळल्याचा आरोप चौधरी यांनी केला. प्रियांका गांधींची मी मुलगी आहे, मी लढू शकते, ही घोषणा केवळ शब्दांपुरतीच मर्यादित आहे का? असा आरोप त्यांनी केला.अकोइजम हे काँग्रेसचे प्रभावशाली नेते असून त्यांना पक्षाचा पाठिंबा असल्याने तक्रारदारांमध्ये भीतीचे वातावरण असल्याचे त्यांनी सांगितले. तक्रार करणाऱ्या तरुणीही भीतीखाली जगत आहेत. तसेच, या तरुणींना पूर्ण संरक्षण आणि सुरक्षा द्यावी, अशी विनंती शिष्टमंडळाने राष्ट्रपतींकडे केली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

भाजपच्या खासदार डी. पुरंदेश्वरी यांनी या शिष्टमंडळाचे नेतृत्व केले. दिल्लीच्या खासदार बांसुरी स्वराज अन्य जणी त्यांच्यासोबत होत्या. दरम्यान, भाजप महिला मोर्चाने दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयाबाहेर आणि हिमाचल प्रदेशातील अनेक ठिकाणी निदर्शने केली होती. यानंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी त्यांनी राष्ट्रपती मुर्मू यांची भेट घेतली. 'इनर मणिपूर'चे खासदार अकोइजम यांना पक्षातून काढून टाकावे, अशी मागणी निदर्शनांद्वारे करण्यात आली होती. सोमवारी दिल्लीतील निदर्शनांमध्ये केंद्रीय महिला व बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी यांच्यासह भाजपच्या अनेक महिला खासदार आणि कार्यकर्त्या सहभागी झाल्या होत्या.

# राहुल यांनी गैरवर्तन केल्याचा गर्भवती पत्रकाराचा आरोप

**नवी दिल्ली** : दिल्लीतील निदर्शनावेळी काँग्रेसचे लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांदी यांनी महिला पोलिस कर्मचारी आणि गर्भवती पत्रकारांशी गैरवर्तन केल्याची घटना घडली आहे. राहुल यांनी धक्का दिल्याचा आरोप गर्भवती पत्रकाराने केला आहे. मात्र, काँग्रेसने आरोप फेटाळले असून एक चित्रफित पोस्ट केली आहे. त्यात राहुल त्यांना धक्का देत असल्याचे स्पष्टपणे दिसत नाही, असा दावा काँग्रेसने केला.

सर्वोच्च न्यायालयाकडे काढण्यात आलेल्या विरोधी पक्षांच्या मोर्चाचे वार्तांकन करत असताना, राहुल आपल्याला जोरात धक्का दिल्याने मी जमिनीवर पडले, असा आरोप एका गर्भवती



पत्रकाराने केल्यामुळे मोठा वाद निर्माण झाला.

'वनइंडिया' या न्यूज वेबसाइटच्या रिचा पराशर यांनी सांगितले की त्या गंभीर जखमी झाल्या आहेत आणि ही संपूर्ण घटना कॅमेऱ्यात कैद झाली आहे. मात्र, काँग्रेसने हा आरोप फेटाळून लावत त्याला अपप्रचार)म्हटले आहे. दरम्यान, रिचा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्या म्हणाल्या, मी सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात, एका प्रवेशद्वाराजवळ उभी होते आणि राहुल बाहेर येण्याची वाट पाहत होते जेणेकरून मला त्यांची प्रतिक्रिया घेता येईल... मी माईक पुढे केला; त्यांनी तो बाजूला करण्याचा इशारा केला, म्हणून मी तो मागे घेतला. पण नंतर मी पाहिले की इतर माईक पुढे केले जात होते. त्यामुळे मी माझा माईक पुन्हा पुढे केला. नेमके काय घडत आहे ? राहुल गांधी अत्यंत अप्रसन्न चेहऱ्याच्या भावनेसह पुढे आले. अचानक त्यांनी माझा हात पकडला – आणि मला जोरात ओढून पुढे केले. जोरात ओढले, हे सर्व इतक्या वेगाने घडले की, त्यांच्या अंगरक्षकांनी मला बाजूला ढकलले. न्यायालयाच्या प्रवेशद्वारापाशी काही पायऱ्या आहेत. तोंडावर त्या पायऱ्यांवर मी पडले, असे पराशर यांनी सांगितले.

# 'बिमस्टेक देशांनी दहशतवादावर कठोर पावले उचलावीत'

**नवी दिल्ली** : बिमस्टेक देशांनी आपल्या भूभागात दहशतवाद्यांना थारा देता कामा नये, त्यांच्याविरोधात कठोर पावले उचलावीत, असे आवाहन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मंगळवारी केले.



बिमस्टेक अर्थात बांगलादेश, भूतान, भारत, म्यानमार, नेपाळ आणि श्रीलंका यांच्या गृहमंत्र्यांची बैठक आयोजित केली होती. त्यावेळी शहा बोलत होते.

शहा म्हणाले, सर्व देशांनी दहशतवादाविरोधात एकत्र यावे आणि शून्य दहशतवादाचे धोरण राबवावे. प्रत्येक देशाने अन्य देशांच्या सुरक्षेची काळजी घेणे काळाची गरज आहे. तसा सुरक्षा व्यवस्थेचा करार झाला पाहिजे. दहशतवाद्यांना थारा मिळणार नाही, यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत. त्यासाठी प्रशिक्षण सुविधा आणि सामर्थ्याचा वापर केला पाहिजे. अन्य देशांतील दहशतवादी कृत्ये हाणून पाडण्यासाठी एकत्रित काम करण्याची गरज आहे. प्रसंगी देशाच्या कायद्याचा प्रभावी वापर करण्यासाठी पावले उचलावीत, असे आवाहन त्यांनी केले.

जागतिक दहशतवाद कळीचा मुद्दा बनला असून, त्यावर कठोर कारवाई करणे काळाची गरज बनली आहे. त्यासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. त्यामध्ये बिमस्टेक देशांनी सहभाग घ्यावा. असे आवाहन शहा यांनी केले.

# सरकार मतांसह बचतही चोरते

### वाढत्या महागाईवरून काँग्रेसची टीका

**नवी दिल्ली** : सरकार मतांसह नागरिकांची बचतही चोरते आहे, अशी टीका काँग्रेसने सोमवारी भाजपवर केली.

अच्छे दिन येतील, असे आश्वासन देत भाजप सत्तेवर आला. हे अच्छे दिन आहेत का ? मतचोरीबरोबरच नागरिकांची बचतही महागाईमुळे चोरली जात आहे. आता पंतप्रधान मोदी यांनी झोला घ्यावा आणि सत्ता सोडावी, अशी टीकाही काँग्रेसने केली. काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश म्हणाले, वाढत्या महागाईमुळे नागरिकांत संताप आहे. मतचोरीमुळे त्यात आणखीनच भर पडली आहे. मात्र, पंतप्रधान त्यावर मौन का बाळगून आहेत. राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाच्या आकडेवारीनुसार महागाईचा दर सप्टेंबरमध्ये ७.७४ टक्क्यांवर गेला आणि त्यापूर्वी ऑगस्टमध्ये तो ६.९७ टक्के होता.

मतांची चोरी सत्य असून वाढत्या महागाईमुळे नागरिकांची कंबर मोडली आहे. सप्टेंबरमध्ये महागाईचा दर ५.५४ टक्के असल्याचे सांगितले गेले. मात्र अन्नधान्यांच्या महागाईचा दर ७.७४ टक्क्यांवर गेला. एकंदरीत सर्वच अन्नधान्याच्या दराने त्यांची मर्यादा ओलांडली आहे. कांदा १०८ टक्के, लसूण ४४ टक्के, आले ६३ टक्के आणि लिंबांचा दर ३५ टक्क्यांनी वाढला आहे. किरकोळ महागाईचा दर सप्टेंबरमध्ये ३.४० टक्क्यांवरून आता ५.५४ टक्क्यांवर पोहोचला आहे. २३ महिन्यांतील तो उच्चांकी आहे असे त्यांनी सांगितले.

# पाकिस्तानात रेल्वेचे १४ डबे घसरून सहा जणांचा मृत्यू

### कराची – पेशावर मार्गावर दुर्घटना; ३० प्रवासी जखमी

**लाहोर** : पाकिस्तानातील पंजाब प्रांतात मंगळवारी पेशावरकडे जाणारी रेल्वे घसरून सहा जणांचा मृत्यू झाला असून ३० प्रवासी जखमी झाले.

रेहमान बाबा एक्स्प्रेस ही कराची ते पेशावर मार्गावर धावत होती. पहाटे सव्वा पाच वाजण्याच्या सुमारास रुळावरून घसरून अपघात झाला. मुलतानमधील शेर शहा पुलाजवळ दुर्घटना घडल्याची माहिती पोलिसांनी दिली. सुमार ५०० जण प्रवास करत असल्याची माहिती पाकिस्तान रेल्वेच्या प्रवक्त्याने दिली. रेल्वे चालकाने सांगितले की, एक्स्प्रेस शेर शाह स्थानकातून पुढे जात होती. अचानक एक धक्का बसला. त्यामुळे ब्रेक मी दाबले. रेल्वे थांबली मात्र, १४ डबे रुळावरून घसरले होते. घसरलेल्या डब्यातून प्रवाशांना



बाहेर काढण्याची मोहीम बचाव पथकाने राबविली आणि जखमींना जवळच्या रुग्णालयात हलवले. दुर्घटनेत सहा जणांचा मृत्यू तर ४० जण जखमी झाले. त्यांनी सांगितले की, पुलाजवळच १४ डबे घसरले होते. दुर्घटनेनंतर मुलतान येथून बचाव पथके आणि नागरिकांना सुरक्षित स्थळी घेऊन जाण्यासाठी पर्यायी रेल्वे घटनास्थळी रवाना केली होती. दुर्घटनेमुळे मार्गावरील वाहतूक बंद पडली होती. मुलतानचे आयुक्त अमीर करीमखान यांनी घटनास्थळाला भेट दिली आणि प्रवासी व कुटुंबीयांना सर्व ती मदत करण्याचे आश्वासन दिले.

# खनिज तेलाचे दर घसरले

### रशियाकडून पुढील महिन्यात डिझेलचा पुरवठा कमी दरात

**नवी दिल्ली** : खनिज तेलाचे दर मंगळवारी प्रति पिंप २१५ रुपयांनी कमी झाले. एका पिंपाचा दर ८ हजार ७६५ रुपये झाला आहे. पश्चिम आशियातील वातावरण आणि जागतिक पुरवठ्यातील अडथळे पाहता रशियन डिझेलचा अतिरिक्त पुरवठा वाढणार असून त्याचे दर सरासरी दोन टक्के कमी असतील, असे चित्र आहे. ऑक्टोबरमध्ये पुरवठा करण्यात येणाऱ्या खनिज तेलाच्या एका पिंपाचा दर काल २.३९ टक्क्यांनी अर्थात २१५ रुपयांनी कमी झाला. त्यामुळे एका पिंपाचा दर ८ हजार ७६५ रुपये होता, अशी माहिती मल्टी कमोडिटी एक्सचेंजकडून देण्यात आली. त्याच प्रमाणे नोव्हेंबरमध्ये कंत्राटानुसार प्रति पिंपाचा २१३



रुपये असणार आहे. दर २.३९ टक्क्यांनी कमी झाल्याने एक पिंप ८ हजार ७६५ रुपयांना मिळणार आहे. एकंदरीत नोव्हेंबरमध्ये ऑक्टोबरच्या तुलनेत खनिज तेल कमी दरात मिळणार आहे. मल्टी कमोडिटी एक्सचेंजच्या दरानुसार खनिज तेलाचे दर २ टक्क्यांनी कमी राहणार आहेत. सौदी अरेबियावरील हल्ल्यानंतर रशियाकडून डिझेलचा अतिरिक्त पुरवठा वाढणार आहे, अशी माहिती विश्लेषक पिंकी यादव यांनी दिली.

# योगी आणि यादव यांची नुरा कुस्ती : ओवेसी

## मतदारसंघ बदलून दाखवण्याचे आव्हान

**लखनौ** : उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ आणि समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यात नुरा कुस्ती सुरू आहे, अशी टीका एमआयएमचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी केली. अशी कुस्ती लढण्यापेक्षा आदित्याथ यांनी संभळ येथून आणि अखिलेश यांनी गोरखपूर मतदारसंघातून निवडणूक लढवून दाखवावी, असे आव्हान त्यांनी दिले.

आदित्यनाथ आणि अखिलेश यांनी एकमेकांना अयोध्या मतदारसंघातून निवडणूक लढवून दाखवण्याचे आव्हान नुकतेच दिले होते. त्या पार्श्वभूमीवर ते लखनौमध्ये बोलत होते.



उत्तर प्रदेशच्या आगामी विधानसभा निवडणुकीत भाजप आणि समाजवादी पक्षाने हातमिळवणी केल्याचा आरोप ओवेसी यांनी केला आहे. दोन्ही पक्ष नोरा कुस्ती अर्थात मॅच फिक्स करून ते निवडणूक लढवत असल्याचा आरोपही केला. दोन्ही पक्ष आपली ताकद असलेल्या मतदारसंघातून मैदानात उतरत आहेत. २०२७ मध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी मतदारसंघ बदलून निवडणूक लढवावी, असे आव्हान त्यांनी दिले. दरम्यान, संभळ विधानसभा मतदारसंघ हा समाजवादी पक्षाचा गड मानला जातो. तेथे मुस्लिम धर्मीय मतदारांची संख्या मोठी आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ पाच वेळा गोरखपूर मतदारसंघातून विजयी होत आले आहेत. सध्या ते गोरखपूर शहर मतदारसघांचे प्रतिनिधीत्व करतात. या वेळी त्यांनी राम मंदिरातील देणगी गैरव्यवहारावर टीका केली. हजारो, कोटी रुपयांचा निधीची अफरातफर झाल्याचे ते म्हणाले. आरोपी तुरुंगात असले तरी त्यांच्या जामिनाची चर्चा होत आहे. प्रकरणातील खरे दोषी मात्र मुक्तपणे वावरत असल्याचा आरोप त्यांनी केला. अयोध्या मतदारसंघावरून दोन्ही पक्षांत राजकीय शब्दयुद्ध सुरू आहे. हा प्रकार नोरा कुस्ती अर्थात मॅच फिक्सींग आहे. त्यामुळे योगी यांनी संभळमधून निवडणूक लढवावी आणि तेथे सांगावे मशीद पाडली असून मला मते द्या.

देवाच्या इच्छेनुसार नागरिक नक्कीच त्यांचा पराभव करतील. यादव यांनी गोरखपूरमधून निवडणूक लढवावी आणि सांगावे की, राज्यसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीच्या उमेदवाराला पराभूत करण्यासाठी झारखंडमध्ये आमदारांना फोडले. ते म्हणाले, यादव यांनी सांगितले की, मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी अयोध्येतून निवडणूक लढवावी. यानंतर दोनच दिवसांत ते म्हणाले, अयोध्येची जागा समाजवादी पक्षाने लढवावी.

# दहशतवादी युनूस येथे कसा?

### न्यूयॉर्क विमानतळावर हेटाळणी!

**न्यूयॉर्क** : न्यूयॉर्क विमानतळावर बांगला देशाचे माजी हंगामी पंतप्रधान मोहम्मद युनूस यांना टीकाकारांनी लक्ष्य केले; त्यांना 'दहशतवादी' असे संबोधले. कट्टरपंथी जमावाकडून अल्पसंख्याक आणि अनेक प्रतिष्ठित संस्थांना लक्ष्य करण्यास परवानगी दिल्याबद्दल टीकाकारांनी मोहम्मद युनूस यांना जबाबदार धरले आहे, तर युनूस यांच्या सरकारने या घटनांचे वर्णन केवळ 'कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न ' असे केले होते.



समाज माध्यमांवर फिरलेल्या एका चित्रफितीत एक व्यक्ती युनूस यांना अरे दहशतवाद्या, तू इथे का आला आहेस? याबाबतची पोस्टमुळे खळबळ उडाली ओह. ऑगस्ट २०२४ ते फेब्रुवारी २०२६ या काळात बांगला देशच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस होते. न्यूयॉर्कच्या जॉन एफ. केनेडी विमानतळावर आले असाताना त्यांची हेटाळणी करण्यात आली. त्यांना दहशतवादी संबोधले आणि बांगलादेशातील लोकशाही नष्ट केल्याचा आरोप केला.

माजी पंतप्रधान शेख हसीना यांचे सरकार पाडल्यानंतर ते सत्तेवर आले होते. निवडणुकीत मात्र त्यांचा पराभव झाला होता.

# हॉलीवूड अभिनेते मिट्टे यांचे निधन

**लॉस एंजेलिस** : 'ब्रेकिंग बॅड' या गाजलेल्या गुन्ह्यावरील चित्रपटाचे अभिनेते आरजे मिट्टे यांचे निधन झाले. ते ३४ वर्षांचे होते. चित्रपटात त्यांनी वॉल्टर व्हाईटच्या मुलाची भूमिका केली होती. सेरेब्रल पाल्सीसोबत जगण्याच्या आपल्या अनुभवाचा खुबीने करुन हॉलिवूडमध्ये दिव्यांगांच्या हक्कासाठी आवाज उठवण्यासाठी केला होता. अमेरिकेच्या टीएमझेड या मनोरंजन संकेतस्थळाने दिलेल्या वृत्तानुसार, मिट्टे यांनी सोमवारी टेक्सासमध्ये आत्महत्या केली आहे. एक लोकप्रिय अभिनेते, समाजसेवक आणि दिव्यांगांचे खंदे समर्थक मिट्टे यांच्या निधनाचे वृत्त देत असताना अतिशय दु:ख होत असल्याचे संकेतस्थळ टीएमझेडच्या प्रतिनिधीने सांगितले.

गजालिश्रेष्ठा । या निबिडतर कांतारजठरी । मदांधाक्षा मित्रा । क्षणभरिही वास्तव्य न करी ।
नखाग्रांनी येथे गुरुतरशिला भेदुनि करि । भ्रमाने आहे रे, गिरिकुहरि हास निद्रित हरि ।।

केसरी

तव स्मरण संतत स्फुरणदायी आम्हां घडो। त्वदीय गुणकीर्तनध्वनि सुरम्य कर्णी पडो।
स्वदेशहितचिंतनाविण दुजी कथा नावडो। तुझ्यासमचि आमुची तनुहि देशकार्यी पडो।।

# गरज की स्वार्थ ?

रशियाबरोबर अमेरिकेने डिझेल खरेदीचा करार केला आहे. हा निर्णय रशिया आणि रशियाकडून तेल खरेदी करणाऱ्या देशांना दिलासा देणारा असला तरी त्यातून डोनाल्ड ट्रम्प यांचा दुटप्पीपणा देखील जगासमोर आला. रशियाकडून तेल खरेदी करण्यावर याच ट्रम्प यांनी अलीकडे निर्बंध लादले होते. त्याचा आधार घेत भारतासह अन्य देशांना पुन्हा धमकावण्यास सुरुवात झाली होती. रशियाशी व्यापार म्हणजे युक्रेनविरुद्धच्या रशियाच्या युद्धाला मदत, अशी सोयीची मांडणी ट्रम्प यांच्याकडून केली जात होती. कुठूनही रशियाच्या आर्थिक आधाराला तडा द्यायचा आणि रशियाची आक्रमक क्षमता कमी करायची, हा त्यांचा प्रयत्न; पण सद्य:स्थितीत आपल्या परंपरागत शत्रूला नमवण्यापेक्षा त्याच्याकडून फायदा करून घेता येऊ शकतो, हे आर्थिक हित महत्त्वाचे मानणाऱ्या ट्रम्प यांनी लवकर ओळखले. हे आर्थिक हित



**रशियाच्या ऊर्जा उत्पादन केंद्रांवर युक्रेनने सातत्याने हल्ले केले. यामुळे निर्बंध उठले तरी रशियाकडून सातत्याने पुरवठा कितपत होईल याची शंका आहे. मात्र; या मुद्द्यावरून युक्रेन आणि अमेरिका यांच्यातील दरी वाढेल. रशियासाठी ते फायद्याचे आहे.**

अमेरिकेचे नव्हे, तर त्यांचे स्वतःचे! ते अगदीच डोळ्यावर येऊ नये यासाठी तात्त्विक मुलामा देण्यात ट्रम्प सराईत आहेत. जागतिक बाजारपेठेत तेलाचे दर नियंत्रणात राहावेत, अशी सबब त्यांनी आता पुढे केली आहे. ट्रम्प यांनी इराणबरोबर युद्ध सुरू करून जागतिक अर्थव्यवस्थेची घडी मोडून टाकली. युद्धामध्ये इराण तर नमला नाहीच, उलट हुथी बंडखोरांच्या मदतीने सौदी अरेबियावर हल्ले सुरू आहेत. अमेरिकेला लष्करी तळासाठी जागा देणे आणि संरक्षण म्हणून त्या देशाकडे पाहणे हे सौदी अरेबियासह अनेक देशांसाठी धोकादायक ठरले आहे.

## नरमाईची भूमिका

तेल अर्थात काळ्या सोन्यावर अवलंबून असलेले आखाती देश आज अगतिक झाले आहेत. हे देश आणि त्यांची अर्थव्यवस्था पूर्वपदाला येण्यासाठी फार मोठा काळ जावा लागेल. कदाचित या देशांचे आतापर्यंतचे वैभव हा भूतकाळ ठरण्याचीच शक्यता अधिक. या सर्व अनर्थाला ट्रम्प हे कारण ठरले. नोव्हेंबरमध्ये ते मध्यावधी निवडणुकीला सामोरे जाणार आहेत. त्याआधी जागतिक पातळीवर तेल पुरवठ्याची टक्केवारी आणखी कमी होऊन किमतीचा भडका आणखी वाढू नये हा त्यांचा प्रयत्न आहे. याला दुसरीही एक बाजू आहे. ट्रम्प अमेरिकेच्या परंपरागत शत्रूंच्या बाबतीत कायम नरमाईची भूमिका घेतात, असा मतप्रवाह ठामपणे मांडला जातो. चीन आता तंत्रज्ञानासह सर्व क्षेत्रात अमेरिकेच्या बरोबरीच्या स्थानावर पोहोचला आहे. आतापर्यंत अमेरिकेकडून चीनवर दबावासाठी तैवानच्या मुद्द्याचा सातत्याने वापर केला जात होता. भविष्यकाळात चीन हाच अमेरिकेसमोर सर्वांत मोठे आव्हान ठरणार आहे, असा स्पष्ट अहवाल अमेरिकेच्या संरक्षण विभागाने प्रसिद्ध केला. त्याच चीनच्या अध्यक्षांसाठी ट्रम्प यांनी पायघड्या घातल्या. दुर्मिळ खनिजांच्या पुरवठ्याची साखळी चीनवर अवलंबून आहे. त्यात खंड पडू नये यासाठी अगतिक झालेल्या ट्रम्प यांचे दर्शन नुकतेच घडले; पण धमकावत राहण्यासाठी समोर कोणीतरी पाहिजे, ती ट्रम्प यांची मानसिक गरज आहे. त्यासाठी त्यांनी भारताची निवड केली आहे. रशियाशी असलेली मैत्री, तेलाच्या पुरवठ्यावर आलेल्या मर्यादा आणि देशांतर्गत गरज, या सर्व पार्श्वभूमीवर भारताने रशियाकडून तेल खरेदी सुरूच ठेवली. यामुळे तिळपापड झालेल्या ट्रम्प यांनी अनेकदा भारताला धमकावले. 'आम्ही आमच्या गरजा लक्षात घेऊन तेल खरेदीचा निर्णय घेतो', हे पठडीतील उत्तर भारताने वारंवार दिले खरे; पण सातत्याने तीच ती धमकी देणाऱ्या ट्रम्प आणि अमेरिकेला याहून स्पष्ट आणि कठोर शब्दांत सुनावण्याचे धाडस आपल्या सरकारला झाले नाही. ही कटु वस्तुस्थिती होय. हे धमकीसत्र सुरू असताना ट्रम्प महाशय रशियाकडून युरेनियमची खरेदी करतच होते! आता स्वतःचा फायदा आणि काही प्रमाणात जागतिक स्थिती यामुळे त्यांनी रशियावरील डिझेल विक्री, आयात याबाबतचे निर्बंध हटविले. युक्रेनच्या अध्यक्षांना बदलले पाहिजे, अशी जाहीर भूमिका त्यांनी लगोलग घेतली. त्यांच्या लहरीपणाला ते साजेसेच म्हणावे लागेल. आतापर्यंत अमेरिका आणि पाश्चात्त्य देशांच्या मदतीवर युक्रेन लढत आहे. आर्थिक गरज आणि राजकीय खेळी यातून अमेरिका–रशिया यांचे डिझेलच्या बाबतीत सहकार्य झाले. आता युक्रेनबरोबरचे युद्ध थांबेल, यासाठी ट्रम्प यांनी अधिक सक्रिय व्हावे. जागतिक हितासाठी ते गरजेचे आहे.

# पुस्तक वाचनातून समाजात शहाणपणाची पेरणी

***उद्याच्या दि. १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांचे स्मरण करताना, आपण त्या वाटेचा प्रवास करण्याची गरज आहे.***

पुस्तके मानवी जीवनाला उद्धाराचा मार्ग दाखवत असतात. शिक्षणाने शिक्षित झालेली माणसे पुस्तकाच्या सहवासात अधिक फुलतात आणि बहरतात. मात्र केवळ शाळेची पाठ्यपुस्तके वाचून बहरणे आणि फुलणे होईलच असे नाही. शाळेत अक्षरांची साक्षरता येते. त्या साक्षरतेला समृद्धतेच्या आणि अर्थपूर्णतेच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी पुस्तकातील शब्दांना अर्थ प्राप्त करून देण्याचे काम वाचनाने घडते.

शिकलेली माणसे पदव्या मिळवतील, पण शिक्षणातील अपेक्षित बदल आणि ध्येयापर्यंतचा प्रवास पुस्तके घडवत असतात. केवळ शिक्षणाने वर्तमानात शहाणपण येते असे नाही. त्याचे कारण शिक्षणाचा अर्थ केवळ पुस्तक आणि मार्कापुरते मर्यादित झाला आहे. त्यामुळे शालेय जीवनात जोपर्यंत अवांतर पुस्तके हाती पडून इतिहास आणि वर्तमान जाणून घेता येणार नाही तोपर्यंत शिक्षण केवळ हुशारी पेरत राहील आणि शहाणपणाला समाज पोरका बनत राहील. पुस्तके म्हणजे वास्तवाचे दर्शन असते. विवेकाची पेरणी असते. शहाणपण जपणे असते. प्रामाणिकपणाची ओळख असते. सत्ता आणि संपत्तीचा अर्थ जाणणे असते. पदाची आणि माणसांच्या उंचीतील फरक ओळखणे असते. जीवनात सत्य की सत्ता, चेहरा की मुखवटा. प्रामाणिकपणा की अहंकार, सत्त्व, तत्त्व की खोटी प्रतिष्ठा यात नेमके काय हे पुस्तकांच्या सहवासाने कळत जाते. पुस्तकाने सत्तेची आणि संपत्तीची उंची आणि माणूसपणाची उंची यातील महत्त्व अधोरेखित होताना योग्य निवडीचा विवेक अंगी येण्यास मदत होते. पुस्तकांनी जीवन फुलते हे खरेच, पण त्याचवेळी पुस्तके जीवनाची समृद्धतेची वाटचाल सुरू राहावी या करता शक्ती बहाल करत असतात. पुस्तकांनी घडवलेली मस्तके कोणाच्याही चरणावर नतमस्तक होत नाहीत. ती माणसे स्वाभिमान जपून असतात. त्यांना आनंदाच्या वाटा सापडत जातात.

पुस्तकं माणसाच्या आयुष्यावर अत्यंत खोलवर परिणाम करत असतात. आपल्याकडे अनेक राष्ट्र पुरुषांच्या जीवनावर अत्यंत खोलवर परिणाम झालेला आपण जाणतो. कलामांसारखा माणूस राष्ट्रपती होणे हे त्या पदाचा सन्मान होता. पदावर पोहचल्यानंतरही आपल्याला त्या पदाचा लाभ नको. त्या पदाचा कोणताही अतिरिक्त फायदा देखील नको. पद हे विश्वस्त म्हणून भोगायचे असते मालक नाही. देशातील सर्वोच्च पद मिळाल्यानंतर अहंकाराने त्यांना स्पर्श केला नाही. त्यांच्यातील संवेदना संपल्या नाहीत. त्यांच्यातील सहृदयता सातत्याने त्यांनी जोपासली होती. कधी काळी अपंग मुलांच्या कार्यक्रमाला गेल्यानंतर त्या मुलांच्या हाती असलेल्या काठीचे वजन त्यांनी विचारले, तेव्हा ते वजन त्या मुलाच्या शारीरिक क्षमतेपेक्षा अधिक होते. त्या वजनामुळे अंपगांना ते घेऊन चालताना अडचणीचे ठरते. तेव्हा त्या काठीचे वजन कमी करण्यासाठी त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना हलकी काठी तयार करण्यासाठी आदेश दिले. आपल्या पदाच्याद्वारे त्यांनी अपंगासाठी संवेदनांचे दर्शन घडविले. ही संवेदना येते कोठून ? असा प्रश्न कोणालाही पडेलच. त्याचवेळी पुन्हा राष्ट्रपती होण्याची संधी मिळत असताना देखील त्यांनी नकार देणे. इतकी अपेक्षा शून्यता येते कोठून ? आपण सर्वोच्च पदावर असताना आपले कुटुंब गरिबीत आहे म्हणून देखील त्यांना कोणताही फायदा, लाभ मिळवून देण्याचा त्यांनी कधी प्रयत्न केला नाही. याचे कारण त्यांच्यावरती पुस्तकांनी केलेले संस्कार. त्यांनी जीवनभर पुस्तकांशी केलेली मैत्री.

राष्ट्रपती भवन सोडताना केवळ आपली संपत्ती म्हणजे पुस्तके तेवढीच बरोबर नेण्याचा प्रयत्न म्हणजे जीवनातील सत्याचा प्रवास आहे. पुस्तकाच्या सहवासात राहिल्यानंतर जीवनाचा अर्थ उलगडत जातो. जीवनाची सत्यता कळते. जीवनात आनंदाच्या वाटा कोणत्या याचे आकलन होत जाते आणि खोट्या आणि फसव्या मुखवट्याचे त्यांना कधीच आकर्षण वाटत नाही.

### पुस्तकांचा सहवास

पुस्तके आपल्या हाती येणे, त्यांच्या सहवासात राहायला मिळणे ही तर खरी समृद्धी असते. पुस्तके ही सतत मार्गदर्शक असतात. ती कधीच आपल्यावर अन्याय करण्याची शक्यता नसते. जीवनाचा मार्ग त्या




संदीप वाकचौरे

पुस्तकातून दिसू लागतो. हेच पाहाना जगप्रसिद्ध वैज्ञानिक अल्बर्ट आईन्स्टाईन यांना वयाच्या बाराव्या वर्षी त्यांचे गुरू मॅक्स टॅलमूड यांनी युक्लिडीयन भूमिती हे पुस्तक भेट दिले होते. हे पुस्तक हाती आल्यावर त्यांनी असे म्हटले, की या पुस्तकामुळे मला अनेक आश्चर्य सापडली आहेत. या पुस्तकामुळे विशुद्ध विचार आणि प्रांत या संकल्पनेची ओळख झाली. त्यासाठी त्यांना पुस्तकांनी मदत केली. हे सामर्थ्य त्यांना पुस्तकांच्या मदतीने प्राप्त झाले. कलामांनी देखील जीवनभर सत्याची वाट चालत राहण्यासाठी पुस्तकांचीच निवड केली होती. त्यांनी म्हटले आहे, की मी लाईट फॉर मेनी लँम्प्स हे लिलियन आयशर वॅटसन यांनी संपादित केलेले पुस्तक १९५३ ला जुन्या बाजारातून खरेदी केले होते. हे पुस्तक पाच दशकांहून अधिक काळ माझी सोबत करीत आहे. ते वाचून इतके जुने झाले आहे, की अनेक वेळा बाईंडीग केले आहे. माझ्या आयुष्यात जेव्हा जेव्हा समस्या उभी राहाते तेव्हा तेव्हा ते पुस्तक मी उघडतो. तेव्हा ते पुस्तक मला सावरते. अनेकदा जीवनात आनंदाचे भरते येते तेव्हा मन सैरभैर होते तेव्हा मनाचा समतोलपणा साधण्याकरिता पुस्तकच मदत करतात.

### पुस्तकातून प्रकाशवाटा

जीवनाची उंची आणि हिमालया एवढी उंचीची माणसे पुस्तकातील शब्दांनी उलगडत गेल्याने त्यांच्या आयुष्याच्या प्रकाशवाटा वाचणाऱ्याचे आयुष्य उजळून टाकतात. पुस्तकांच्या प्रकाशात उजळणारे आयुष्य कधीच खोट्या प्रतिष्ठेमागे चालत जात नाही. आपण काय आहोत ? याची जाणीव होत जाते. आपण स्वतःला ओळखायला शिकतो. आपल्या मर्यादा आणि आपली बलस्थाने यांची ओळख होते. त्यातून वाचणाऱ्याच्या मनावर देखील शब्दांचा प्रभाव पडतो. त्या शब्दांतील केवळ अक्षर वाचण्याऐवजी त्या अक्षरातील अर्थ उलगडत जातात. त्या अर्थातून जीवनाचा अर्थ शोधणे घडते. ती केवळ शब्द नसतात. तो प्रत्येक शब्द म्हणजे एक अनुभव असतो. त्या प्रत्येक अनुभवात जीवन उभे करण्याची शक्ती असते. बाबासाहेब आंबेडकर यांनी पुस्तकाचे महत्त्व जाणले होते. जीवन पुस्तके वाचण्यासाठी आहे. आपल्या आयुष्यात ही पुस्तके क्रांती घडून आणतील याची त्यांना जाणीव होती, म्हणून परदेशातून येताना त्यांनी सोबत केवळ पुस्तके आणली होती. त्यांना जीवनाचा अर्थ पुस्तकात दिसला होता. त्यांना ना परदेशी वस्तू आकर्षित करू शकल्या, ना त्यांना धन, संपदा. वाचन जीवनाला अर्थ देत जाते. महात्मा फुले यांच्या आयुष्यात आलेल्या एका पुस्तकाने त्यांना जीवनाची वाट सापडली. महात्मा गांधी यांच्या जीवनात आलेल्या एका गोष्टीने त्यांचा मोहनदास करमचंद गांधी ते महात्मा हा प्रवास घडविला. नरेंद्र दत्त यांच्या आयुष्यात आलेली वर्डस्वर्थच्या कवितेने त्यांना जीवनाचा अर्थ उलगडत गेला. मोठ्या माणसांच्या आयुष्यावर पुस्तकांचा मोठा प्रभाव होता हे त्यांचे चरित्र सांगत असते.

पुस्तकांमध्ये न रमणारी माणसे अनेकदा दुःखात असतात. त्याचे कारण जीवनाचे सार कशात आहे याचे दिशादर्शन झालेले नसते. जीवनात पुस्तके दृष्टीत बदल घडवतात. एखाद्या प्रश्नाकडे, परिस्थितीकडे, प्रसंगाकडे कसे पाहायचे असते हे त्या दृष्टीने घडते. अनेकदा जीवन न कळलेल्या माणसांच्या आयुष्यात अर्थ न सापडता प्रवास करत जाताना त्यांना आनंद मिळतो, पण ते कोठे चालले आहे याची वाट ते हरवलेले असतात. पुस्तके आयुष्याला घडविण्याचा प्रयत्न करीत असतात. म्हणून पुस्तकांच्या सहवासातील समृद्धता वेळेचे महत्त्व सांगत जाते. पुस्तके आपण कोण आहोत आणि आपल्या मर्यादा काय आहेत याची जाणीव करून देत असतात. आपली बलस्थानांची ओळख होते आणि जीवनाच्या उन्नतीसाठी उत्तम गुणांची जाणीव करत जातात. परिस्थिती, संकटे येतात तेव्हा त्यांना सामोरे जाण्याची शक्ती मिळते. पुस्तकांमुळे मनात सकारात्मकता ठासून भरली जाते. भाषेतील शुद्धता आणि मानवी जीवनासाठी लागणारे शहाणपण याची ओळख होते. पुस्तके वाचणाऱ्या माणसांची प्रतिमा समाजमनात वेगळीच असते. ती माणसं संपूर्ण प्रवासात माणूसपण केंद्रस्थानी ठेवतात.

पुस्तके, लेखक, कवी हे वाचकांची सद्सद्विवेक बुद्धी जागृत ठेवण्याचे काम करीत असतात. पुस्तकाची किंमत कधीकधी वाचताना कळत नसेल पण प्रसंग आल्यावरती त्या पुस्तकातील विचार मात्र निश्चित उपयोगी पडू शकतात. पुस्तकांच्या सहवासाने चुकीच्या दिशेने जाण्याची शक्यता नाही. भ्रष्ट आचरण आणि पैशाचा भ्रष्टाचार करण्याकडे त्यांचा कल फारच कमी असू शकतो. मात्र पुस्तके वाचून जीवन परिवर्तनाच्या वाटेने जात नसेल, तर तो पुस्तकांचा पराभव नाही. तर त्या पुस्तकांनी जे काही सांगितले आहे त्या विचारांचे चिंतन, मनन झालेले नाही.

### अखंड ज्ञानाचा प्रवास

जीवनात ज्ञानाच्या क्षेत्रात आदान प्रदान करण्याचा व्यवसाय करणाऱ्यांनी तर पुस्तकांशी संगत करायला हवीच. त्या संगतीने त्या व्यक्तीची उंची वाढते आणि अंखड ज्ञानाचा प्रवास घडत जातो. त्या प्रवासाने त्यांच्या सोबत काम करणाऱ्या प्रत्येकाला ज्ञानाची वाट दिसत जाते. ज्ञानाचे तेज प्रचंड असते. त्या तेजात बाहूंच्या शक्तीचा विचार करावा लागत नाही. त्या तेजापुढे बाहूची शक्ती देखील चालत नाही. ज्ञानाच्या शक्तीने हजारो माणसं दीपत जातात आणि लाखो माणसं प्रतिभेच्या मागे चालत येतात. खोट्या वाटा शोधून भक्त शोधावे लागत नाही. मुखवट्यांची गरज पडतच नाही.

### वाचत राहू या!

समाजात पोलिस, न्यायालयांची संख्या, तुरुंगाची संख्या वाढत जाते तेव्हा ते चांगल्या समाजाचे लक्षण नसते. ते उत्तम काही पेरायचे राहून गेले असेच काही असते. तो शिक्षणाचाही पराभव असतो. शिक्षणातून अखंड शिक्षणाचा विचार पेरायला हवा असतो. तो शिक्षण विचार म्हणजे केवळ औपचारिक शिक्षणाचा भाग नाही तर अखंड ज्ञानसाधना देखील आहे. त्या साधनेने शिक्षण होत राहते. त्यामुळे समाजात ज्ञानसंपन्न आणि सातत्याने ज्ञानाचा प्रवास करणारी माणसे हीच समाजाची श्रीमंती आहे. ज्या समाजात ही संपन्न माणसे असतात तिथे संघर्ष आणि युद्धाची शक्यता नसते. वाचता समाज हा शांतता प्रिय असतो. तो उत्तमतेचा ध्यास घेऊन कार्यरत राहतो. नव्याचा शोध आणि सर्जनशील विचारांची पेरणी करत राहतो. आपण त्या दिशेने जाण्यासाठी वाचते होण्याची गरज आहे. गाव तेथे ग्रंथालय असायला हवे. शाळा, महाविद्यालयातून आपल्याला अधिक चांगला माणूस व राष्ट्र निर्माण करायचे असेल तर शाळा महाविद्यालयात समृद्ध ग्रंथालय असायला हवीत. त्यातून मोठी माणसे जाणता येतील आणि वर्तमानात छोट्या माणसांच्या दिसणाऱ्या मोठ्या सावल्या हळूहळू हटतील. हे घडेल तर आपल्याला नव समाजनिर्मितीचे आव्हान सहज पेलता येतील. हाती पुस्तके आली तर हिंसेच्या बंदुका गळून पडतील. द्वेषाचे शस्त्र निकामी बनेल. लोकशाहीच्या नावाखाली होणारे खोटे खेळही थांबतील. उत्तम काय याचा विचार अंत:करणात रूजेलही.. म्हणून चला वाचते होऊया..

# अध्यात्माचा अर्थव्यवस्थेला 'आशीर्वाद'

भारतीय धार्मिक आणि आध्यात्मिक बाजारपेठ आता केवळ श्रद्धेपुरती मर्यादित राहिली नसून मोठ्या आर्थिक उलाढालीचे क्षेत्र बनत आहे. ताज्या बाजार अहवालानुसार, २०२४ ते २०३२ या कालावधीत या बाजारपेठेचा वार्षिक विकासदर सुमारे दहा टक्के राहण्याचा अंदाज असून २०३२ पर्यंत तिचे मूल्य सुमारे १३८ अब्ज अमेरिकी डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते. धार्मिक पर्यटन, यात्रास्थळांना भेटी आणि आध्यात्मिक कार्यक्रमांकडे वाढता कल यामुळे या क्षेत्राला चालना मिळत आहे. हिंदू, बौद्ध, जैन, शीख, इस्लाम, ख्रिश्चन आणि अन्य धार्मिक परंपरांशी संबंधित सेवा व वस्तूंची मागणी या बाजारपेठेला व्यापक आकार देत आहे. श्रद्धेभोवती होणारा खर्च पर्यटन, निवास, वाहतूक, पूजा साहित्य, धार्मिक स्मृतिचिन्हे आणि आध्यात्मिक शिक्षण अशा अनेक क्षेत्रांना हातभार लावत आहे. या बाजारपेठेतील वेगाने बदलणारा चेहरा म्हणजे डिजिटल माध्यमांचा वाढता वापर. स्मार्टफोन आणि इंटरनेटमुळे धार्मिक ग्रंथ, स्तोत्रे, मंत्र, प्रवचने आणि आध्यात्मिक मार्गदर्शन संकेतस्थळे, चलभाषा अनुप्रयोग आणि समाजमाध्यमांद्वारे सहज उपलब्ध होत आहे. तरुणांना आकर्षित करण्यासाठी आध्यात्मिक संस्था आणि गुरु ऑनलाइन प्रवचने, ध्यानसत्रे आणि अभ्यासक्रम राबवत आहेत. मूर्ती, धार्मिक दागिने, अगरबत्ती, मेणबत्त्या, फुले, हार आणि धार्मिक साहित्य यांच्या मागणीतही वाढ होत आहे. धार्मिक सण, यात्रा आणि आध्यात्मिक शिबिरांमधील खरेदी स्थानिक व्यापाऱ्यांपासून मोठ्या कंपन्यांपर्यंत अनेकांसाठी उत्पन्नाचे साधन ठरत आहे. भारतीय अध्यात्मावरील पुस्तके, योग, ध्यान आणि स्व–विकास साहित्याला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय मागणी मिळत असल्याने प्रकाशन क्षेत्रालाही संधी निर्माण झाली आहे. पर्यावरणपूरक अगरबत्ती, सेंद्रिय पूजासाहित्य आणि जैवविघटनशील धार्मिक वस्तूंची मागणी हा आणखी एक महत्त्वाचा कल आहे.




धार्मिक आणि आरोग्यकेंद्रित पर्यटनाचा संगम या बाजारपेठेच्या पुढील विस्ताराचा आधार ठरू शकतो. ऋषिकेश, वाराणसी आणि धर्मशाळेसारखी ठिकाणे आध्यात्मिक साधना, योग, ध्यान आणि सर्वांगीण आरोग्यसेवांसाठी देश–विदेशातील पर्यटकांना आकर्षित करत आहेत. त्यामुळे धार्मिक स्थळांभोवती हॉटेल, प्रवास, भोजन, स्थानिक वाहतूक आणि स्मृतिचिन्हांच्या व्यवसायाला फायदा होत आहे. या बाजारपेठेच्या उत्पन्नात धार्मिक पर्यटनाबरोबरच देणग्या, धार्मिक वस्तूंची विक्री, पुस्तके, संगीत, माध्यमे, बांधकाम आणि पायाभूत सुविधांचा समावेश आहे. मंदिर विश्वस्त संस्था, धार्मिक प्रसारमाध्यमे, प्रवास कंपन्या, पूजासाहित्य उत्पादक आणि ऑनलाइन सेवा देणारे व्यवसाय या परिसंस्थेत सक्रिय आहेत. त्यामुळे १३८ अब्ज अमेरिकी डॉलरच्या संभाव्य बाजारमूल्याकडे पाहताना ही केवळ श्रद्धेची कहाणी नसून पर्यटन, डिजिटल अर्थव्यवस्था, किरकोळ व्यापार आणि सेवा क्षेत्रांना जोडणारी आर्थिक संधी म्हणून या बाजारपेठेकडे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## वाचक लिहितात

### सरकारला प्रश्न विचारले जाणारच



सत्ताविरोधी पक्ष तसेच कॉक्रोच जनता पार्टीने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कारभाराविरोधात आणि ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी दिल्लीत पुकारलेले आंदोलन मोदी सरकारने दडपण्याचा प्रयत्न केला. मुळात निवडणूक आयोग ही एक स्वायत्त संस्था आहे आणि अशा संस्थेच्या आयुक्तास – ज्ञानेश कुमार यास 'वाचविण्यात' मोदी सरकारला इतके 'स्वारस्य' ते काय असावे, या प्रश्नातच अनेक उत्तरे दडली आहेत. ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात पुकारलेल्या आंदोलनात अकारण उडी घेऊन सरकारने दिल्ली शहराची जी काही नाकेबंदी केली, ती हात दाखवून अवलक्षण या सदरात मोडणारी आहे. 'राजा जेव्हा भयग्रस्त असतो तेव्हा तो दमन करतो!' हेच खरे! असे म्हणतात की, सरकारला प्रश्न विचारले की, लोकशाही बळकट होते; पण लोकशाहीची जननी असलेल्या आजच्या अमृतकाळात सरकारला प्रश्न विचारले की, अडचणींत भर पडते. तरीही कोणाला पटो वा न पटो; आवडो अथवा ना आवडो लोकशाहीत सरकारला प्रश्न हे विचारले जाणारच.

**बाळकृष्ण शिंदे**, पुणे

### लावणी कलावंत

ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधु कांबीकर यांचे निधन झाले. मराठी मनोरंजनसृष्टी एका संवेदनशील कलाकाराला मुकली आहे. त्यांनी चित्रपट, लोकनाट्य, व्यावसायिक रंगभूमी ते दूरदर्शन मालिकांमध्ये महत्त्वाच्या भूमिका साकारल्या. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांच्या 'शापित' या चित्रपटातून मधु कांबीकर यांच्या अभिनयाची विशेष दखल घेतली गेली. २०१८ मध्ये त्यांना झी चित्र गौरव पुरस्कार सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला होता; पण प्रकृती अस्वस्थ असल्या कारणाने त्या पुरस्कार स्वीकारण्यासाठी सोहळ्यात उपस्थित राहू शकल्या नाहीत.

**विजय देवधर**, पुणे

### 'वंदे भारत' सुरू करा

पुण्यातून गोव्याला जाण्यासाठी गोवा एक्सप्रेस रेल्वे उपलब्ध आहे; परंतु कमी वेळेत आरामदायी सुविधा उपलब्ध करून देणारी वंदे भारत एक्सप्रेस गाडी मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनलवरून सुटणारी गाडी मुंबईकरांना गोवा फिरण्यासाठी उत्तम रेल्वे आहे. पुणे ते गोवा वंदे भारत ट्रेन भारतीय रेल्वेने सुरू करावी अशी पुणेकरांची मागणी आहे. गोवा एक्सप्रेस आणि एर्नाकुलम एक्सप्रेस गाड्यापेक्षा वंदे भारत एक्सप्रेस जास्त आरामदायी असून प्रवाशांना एक सुंदर प्रवास करण्याची संधी निर्माण होऊ शकते. रेल्वे पर्यटन विभागाने लवकरात लवकर पुण्याहून गोव्यासाठी वंदे भारत एक्सप्रेस तात्काळ सुरू करावी.

**विजय आकुर्डेकर**, पुणे

### ज्येष्ठांना सुविधा पुरवा

जगात अनेक देशात ज्येष्ठांची संख्या वाढत चालल्याचे चित्र समोर आले आहे. अमेरिकन जनगणना ब्युरोच्या अहवालानुसार २०२५ मध्ये जगात लहान मुलांपेक्षा ज्येष्ठ वाढले आहेत. आकडेवारीनुसार ५ वर्षांखालील मुलांचा वाटा लोकसंख्येत १० टक्क्यांपेक्षा कमी आहे, तर ज्येष्ठ नागरिकांचा वाटा तब्बल १०.५ टक्के एवढा झाला आहे. जगात जन्मदर सुद्धा घटत चालला आहे. प्रति महिना जन्मदर २.१ किंवा त्यापेक्षाही कमी आहे. अशा ठिकाणी सुमारे ७१ टक्के लोकसंख्या राहात आहे. २०२४ मध्ये जगाची लोकसंख्या ८.१३ अब्ज आहे. ती २०६० पर्यंत १०.२३ अब्ज होण्याचा अंदाज आहे. ज्येष्ठांची संख्या सध्या जपान, चीन व अमेरिका यामध्ये जास्त होत चालली आहे. अनेक युरोपियन देशात ज्येष्ठांना अनेक सुविधा व आरोग्य सेवा पुरवल्या जातात. त्यांना आरोग्यविषयक मार्गदर्शन केले जाते. अनेक ज्येष्ठ प्रकृती चांगली असल्यामुळे देशासाठी आपले योगदान सेवानिवृत्तीनंतर सुद्धा देत आहेत. आज भारतात सुद्धा ज्येष्ठांना अनेक सुविधा पुरविल्या जातात. त्यात आणखी वाढ होण्याची आवश्यकता आहे.

**शांताराम वाघ**, पुणे

### पाण्याचे नियोजन हवे



आता हिवाळा आरंभ होत आहे. हिवाळा चार महिने, उन्हाळा चार महिने व व पुढील वर्षातील जून व जुलै असे दहा महिने पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई राहणार अशी संभावना आहे, ही पाणी टंचाई अतिशय तीव्र व भयानक राहणार आहे. यासाठी शासनाने तसेच सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या संस्था, मंडळ, एन.जी.ओ. यांनी पाणी बचत जागृतीचे व्यापक प्रबोधन करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे. यासाठी पाणी चोरी तात्काळ थांबणे गरजेचे आहे. नसता हे सर्व साठे डिसेंबरअखेर संपून जातील. पाणी ज्याद्वारे शहरात पोहचविल्या जाते ते पाईप वारंवार फुटतात किंवा हेतुपुरस्सर फोडले जातात यावर कडक निगरानी हवी. पाणी गळती थांबवणे, टँकरचे गैरव्यवहार रोखणे आणि पुढील ८ महिने पाणी पुरेल याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

**धोंडीरामसिंह राजपूत**, वैजापूर

केसरी–मराठा ट्रस्टचे हे पत्र मुद्रक व प्रकाशक डॉ. रोहित दीपक टिळक यांनी केसरी मुद्रणालय, ५६८ नारायण पेठ, न. चिं. केळकर रस्ता, पुणे ४११ ०३० येथे छापून ५६८, नारायण पेठ, पुणे ४११ ०३० आणि कैकाडीमहाराज व्यापारसंकुल, माळीवाडा, अहिल्यानगर (अहिल्यानगर आवृत्ती) व द्वारा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, डी मार्ट शेजारी, नरसिंहनगर, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३ ००४ (सोलापूर आवृत्ती) येथे एकाचवेळी प्रकाशित केले. **कार्यकारी संपादक** : **निखिल गजेंद्रगडकर, पुणे** : दूरध्वनी २४४५९०५१, २४४५९२५०, २४४५१६७७; **मुंबई** : सरदारगृह, महात्मा फुले मार्केटजवळ, फोन : २२०८२५०३, **पिंपरी** : पी. जे. चेंबर्स, तिसरा मजला, पुणे–मुंबई महामार्ग, पुणे ४११ ०१८. दूरध्वनी : ७४२४२४०; **अहिल्यानगर** : संत कैकाडीमहाराज व्यापार संकुल, गाळा क्र. २०७, माळीवाडा – अहिल्यानगर. दूरध्वनी : ०२४१–२३५६१५०, ०२४१–२३४१९६२. **सोलापूर** : द्वारा टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, डी मार्ट शेजारी, नरसिंहनगर, जुळे सोलापूर, सोलापूर ४१३ ००४. दूरध्वनी : (०२१७) २३०११९९. **E-mail : punekesari1881@gmail.com, kesarivarta@yahoo.co.in. वेबसाईट – www.dailykesari.com/www.paperboy.com**

© केसरी — हे केसरी–मराठा ट्रस्टचे व्यापारी चिन्ह आहे.

Printed by - Dr. Rohit Deepak Tilak and Published by - Dr. Rohit Deepak Tilak, On behalf of Kesari-Maharatta Trust and printed at Kesari Mudranalay, 568 Narayan Peth, N. C. Kelkar Road, Pune-411030 and Published at 568 Narayan Peth, N. C. Kelkar Road, Pune-411030.

# लडाख भारताचा अविभाज्य भाग

## भारताचे चीनला प्रत्युत्तर

**नवी दिल्ली :** लडाखचा प्रदेश आपलाच असल्याचा दावा करणाऱ्या चीनला भारताने चोख प्रत्युत्तर दिले आहे. लडाख हा केंद्रशासित प्रदेश भारताचा अविभाज्य आणि अतूट भाग आहे. हे एक सत्य असून ते कोणालाही बदलता येणार नाही, अशा परखड शब्दांत भारतीय परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी चीनला खडसावले.

लडाखमधील २८ ठिकाणांची नावे निश्चित करण्याच्या भारताच्या निर्णयावर चीनने आक्षेप घेतला आहे. तसेच, हे भाग आपले असल्याचा दावाही चीनने केला आहे. लडाखबाबतच्या चीनच्या टिप्पणीला भारतीय परराष्ट्र मंत्रालयाने चोख प्रत्युत्तर दिले आहे. चीनने कितीही विरोध केला तरी हे वास्तव बदलणार नाही, असे सांगतानाच जयस्वाल यांनी लडाखच्या भारतीय सर्वेक्षण विभागाच्या नकाशावर या ठिकाणांना औपचारिकपणे ओळख देण्याचा उद्देश, त्यांची ओळख सुलभ करणे आणि सर्वसामान्यांमध्ये अधिक चांगली जागरूकता निर्माण करणे हा आहे, असेही स्पष्ट केले.

### चीनचा आक्षेप

**बीजिंग :** केंद्रशासित लडाखमधील २८ महत्त्वाच्या ठिकाणांना आणि भौगोलिक क्षेत्रांना भारताने नुकतेच अधिकृत नावे दिली होती. या निर्णयाला चीनने विरोध केला आहे. इतकेच नव्हे तर, संपूर्ण लडाखचा प्रदेश आपलाच असल्याचा दावाही चीनने केला आहे.भारताने एकतर्फी आणि बेकायदेशीरपणे स्थापन केलेल्या लडाख केंद्रशासित प्रदेशाला चीनने कधीही मान्यता दिलेली नाही, असे चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले. भारताचा हा निर्णय बेकायदेशीर आणि अवैध आहे. हा प्रदेश चीनच्या मालकीचा असून, ही वस्तुस्थिती कोणी बदलू शकत नाही, असेही त्या म्हणाल्या.

# देशात अराजकता पसरवण्याचे आंतरराष्ट्रीय कारस्थान

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा आरोप



**मुंबई, (प्रतिनिधी) :** परदेशी शक्तींच्या मदतीने काँग्रेस आणि इंडिया आघाडीला देशात अराजकता पसरवायची असून, हे आंतरराष्ट्रीय कारस्थान असल्याचा आरोप उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला. काँग्रेस आणि इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेला मोर्चा हा भारताच्या इतिहासातील काळा दिवस होता, अशी टीकाही त्यांनी केली.

काँग्रेसच्या नेतृत्वाखाली इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सोमवारी सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा काढला होता. या पार्श्वभूमीवर शिंदे यांनी पत्रकार परिषदेत घेऊन विरोधी पक्षाच्या आंदोलनावर टीकास्त्र सोडले. सोमवारचा दिवस हा देशाच्या इतिहासातील काळा दिवस होता. न्यायालयावर मोर्चा काढणे, आंदोलन करणे हे यापूर्वी इतिहासात कधीही घडले नाही. ही घटना म्हणजे देशाच्या सर्वोच्च न्यायव्यवस्थेवर हल्ला आणि न्यायव्यवस्थेचा अपमान असल्याचे सांगत शिंदे यांनी या प्रकरणी विरोधकांकडून माफीची मागणी केली.

पंतप्रधानांच्या निवासस्थाना समोर आंदोलन असो किंवा सध्या दिल्लीत दररोज सुरू असलेली राजकीय आंदोलने, ही देशासाठी धोकादायक आहेत. अनेक परदेशी शक्ती भारताला अस्थिर करण्याचा प्रयत्न करत आहेत. चीन बलवान झाला तसे भारताला बलवान होऊ देणार नाही, असे काहीजण म्हणाले होते. हा आंतरराष्ट्रीय कारस्थानाचा भाग आहे, असा आरोप शिंदे यांनी केला.

विरोधकांना आता निवडणुकांमधून जिंकता येणार नसल्याची खात्री झाली आहे. सत्ता काबीज करता येत नाही तर देशात अशांतता किंवा अराजकता कशी पसरेल, यासाठी ते प्रयत्न करत आहेत. देशाच्या स्वातंत्र्यावर गदा आणण्याचे काम विरोधक करत आहेत, अशी टीका उपमुख्यमंत्र्यांनी केली.

### सर्वोच्च न्यायालयावर मोर्चा हा इतिहासातील काळा दिवस

विरोधक इव्हीएमवर संशय घेतात. निवडणूक आयोगावर हल्ला करतात. मात्र, पुरावे देत नाही. याच निवडणूक आयोगाच्या कार्यकाळामध्ये तेलंगणा, कर्नाटक, केरळ, तमिळनाडू अशी काही राज्य जिंकले, तिथे त्यांनी मत चोरी केली का असा प्रश्न त्यांनी यावेळी उपस्थित केला. विरोधकांनी सरन्यायाधीशांसंदर्भात गंभीर ट्विट केले होते. सरन्यायाधीशांना राजीनामा देण्याबाबत इशारा देण्याची मजल विरोधकांची गेली आहे. ही घातक प्रवृत्ती देशात बळावत असल्याबद्दल शिंदे यांनी चिंता व्यक्त केली.

# 'आप'चे उद्या आंदोलन

**नवी दिल्ली :** कथित 'मत चोरी'च्या विरोधात आम आदमी पार्टी (आप) उद्या (गुरुवारी) दिल्लीत आंदोलन करणार आहे. तसेच, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करणार आहे, अशी माहिती 'आप'चे नेते सौरभ भारद्वाज यांनी मंगळवारी दिली.

या आंदोलनात 'आप'चे आमदार, नगरसेवक यांसह राज्य, जिल्हा, विधानसभा व वॉर्ड स्तरावरील पदाधिकारी सहभागी होतील, असेही ते म्हणाले.

आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी काल 'आप'ची बैठक पार पडली. या बैठकीनंतर याबाबतची घोषणा करण्यात आली. ज्ञानेश कुमार यांचा राजीनामा ही आमची मुख्य मागणी असून, जोपर्यंत ते राजीनामा देत नाहीत, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरूच राहील, असे भारद्वाज म्हणाले. पोलिसांच्या कारवाईनंतरही पक्ष शांततापूर्ण मार्गाने आंदोलन सुरू ठेवेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जंतर-मंतरला आंदोलन स्थळाच्या यादीतून वगळल्याबद्दल 'आप'ने जोरदार टीका केली. जंतर-मंतरवर आंदोलनासाठी परवानगी न दिल्यास आम्ही रामलीला मैदानावर आंदोलन करू, असेही ते म्हणाले.

सरकार आंदोलन दडपण्यासाठी पोलिस बळाचा वापर करत असून सार्वजनिक वाहतूक आणि इंटरनेट सेवांवर निर्बंध लादत आहे, असा आरोप 'आप'चे ज्येष्ठ नेते गोपाल राय यांनी केला.

# उसाला योग्य दर मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नाही

## राजू शेट्टी यांचा निर्धार



**कोल्हापूर :** स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख मागण्यासंदर्भात दिल्लीतील ऊस दराबाबतची बैठक निष्फळ ठरली. त्यानंतर संतापलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेने महाराष्ट्र-कर्नाटक सीमावर्ती कोगनोळी (ता. निपाणी) टोलनाक्यावर पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्ग रोखून बेमुदत आंदोलन सुरू केले. उसाला योग्य दर मिळेपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचा निर्धार संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांनी व्यक्त केला.

मंगळवारी सकाळी अकरापासून कोगनोळी टोलनाक्यासह कराड, सातारा, इंदापूर तसेच मराठवाड्यातील परभणी, नांदेड आणि कर्नाटकातील हुबळी, गदग व हत्तरगी अशा विविध ठिकाणी शेतकरी रस्त्यावर उतरले. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील शेतकऱ्यांनी भाषिक सीमा ओलांडून एकजूट दाखवत सरकारविरोधी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. मला कन्नड येत नाही आणि कर्नाटकातील कार्यकर्त्यांना मराठी येत नाही, तरीही आमचे विचार पटल्यामुळे भाषिक सीमा ओलांडून आम्ही एकत्र आहोत, अशी भावनिक भूमिका नेते राजू शेट्टी यांनी मांडली.

साखरेचा किमान हमीभाव प्रतिकिलो ५० रुपये करावा, सी-हेव्ही इथेनॉलचा दर प्रतिलीटर ७० रुपये करावा आणि हंगाम लवकर सुरू झाल्यामुळे प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे, या तीन प्रमुख मागण्या संघटनेने केल्या आहेत. या मागण्या मान्य होईपर्यंत महामार्गावरील आंदोलन सुरूच राहील, असे शेट्टी यांनी स्पष्ट केले.

उसाचा योग्य दर निश्चित होईपर्यंत ऊसतोड करू नये, असे आवाहन करत विनादर ऊसतोड झाल्यास साखर कारखान्यांतून साखरेचे एकही पोते बाहेर पडू देणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. गरज पडल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# विठ्ठल आणि रूक्मिणी मातेस पारंपरिक पोषाखासह अलंकार

(पान १ वरुन)

मोत्याची कंठी दोन पदरी, शिरपेच, इमिटेशन नेकलेस, चांदीचा मत्स्य, चांदीची छत्री, मोठी बोरमाळ हे अलंकार परिधान करण्यात आले. श्री व्यंकटेशास सोन्याचा मुकुट, मोहरांची माळ, जावेची माळ, तांदळा हार, तुळशीची माळ, मोठा गोफ, चांदीचा कत्स्य, मोत्याची कंठी आदी अलंकार परिधान करण्यात आले. मंदिर समितीच्या अखत्यारीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपरिक पोषाख करण्यात आला आहे. श्रींना परिधान करण्यात आलेले अलंकार अत्युत्कृष्ट व असामान्य कलाकुसरीचे तसेच पुरातन आणि दुर्मीळ आहेत.

नवरात्र महोत्सवानिमित्त श्री विठ्ठलास नऊ दिवस पोषाखावेळी अलंकार आणि रूक्मिणी मातेस विविध प्रकारचे पारंपरिक पोषाखासह अलंकार परिधान करण्यात येत असल्याने भाविकांची मोठी गर्दी होते.

# यूपीआय व्यवहारांवरील एमडीआर आकारणीला स्थगिती

## दिवाळीनंतर होणार अंमलबजावणी?

**नवी दिल्ली :** यूपीआय वापरकर्त्यांना नॅशनल पेमेंट्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाने (एनपीसीआय) मोठा दिलासा दिला आहे. दोन हजारांवरील यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के 'मर्चंट डिस्काउंट रेट' (एमडीआर) आकारण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला आहे. यासंदर्भातील अंमलबजावणीची नवीन तारीख दिवाळीनंतर ठरवली जाईल, असेही एनपीसीआयने म्हटले आहे.

एनपीसीआयने मागील महिन्यात १५ ऑक्टोबरपासून दोन हजारांवरील यूपीआय व्यवहारांवर ०.४ टक्के एमडीआर आकारले जाणार असल्याचे परिपत्रक जारी केले होते.

दरम्यान, सण-उत्सवांचा काळ लक्षात घेऊन एमडीआरची अंमलबजावणी दिवाळीनंतर केली जाईल आणि नवीन तारीख कळवली जाईल, असे एनपीसीआयने निवेदनात म्हटले आहे.

एमडीआरचा भार ग्राहकांवर नव्हे तर व्यापाऱ्यांवर पडणार असून ७५ हजार किंवा त्यावरील व्यवहारांसाठी कमाल मर्यादा ३०० रुपये निश्चित करण्यात आली आहे.

१५ सप्टेंबरच्या अधिसूचनेनुसार, व्यक्ती ते व्यक्ती व्यवहार आणि दोन हजारांपर्यंतचे व्यक्ती ते व्यापारी व्यवहार निशुल्क असणार आहेत. तर, अत्यावश्यक आणि कमी नफा देणारे रेल्वे, दूरसंचार, विमा, इंधन सारख्या क्षेत्रात दोन हजारांपेक्षा जास्त रकमेच्या प्रत्येक व्यवहारावर ५ रुपयांचा एकसमान एमडीआर भरावा लागेल दरम्यान, देशातील यूपीआय पेमेंटचे ऑगस्ट महिन्यात २९. ८ लाख कोटींचे व्यवहार झाले आहेत. मे आणि जुलै २०२६ मध्ये २९.९ लाखांचे विक्रमी व्यवहार झाले होते.

# कचऱ्यापासून तयार होणाऱ्या बायोगॅस प्रकल्पांसाठी कृतिगट

**मुंबई, (प्रतिनिधी) :** राज्यातील शहरांना कचरामुक्त करण्यासोबतच कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) निर्मितीला चालना देण्यासाठी प्रकल्प उभारणीसंदर्भात कृतिगट स्थापन करावेत. ज्या ठिकाणी शक्य आहे, तेथे राज्याच्या सीबीजी धोरणानुसार प्रकल्प उभारावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी दिले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी काल 'वर्षा' निवासस्थानी कचरामुक्त शहरे आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी) प्रकल्पांबाबत आयोजित बैठकीत प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेतला. मुंबई महानगर प्रदेशात कचऱ्याची मोठी समस्या आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महापालिका, वसई-विरार, मीरा भाईंदर, कल्याण डोंबिवली त्याचप्रमाणे पुण्यातील हिंजवडी आणि चाकण परिसरात अशा प्रकारे प्रकल्प उभारण्यासंदर्भात विचार करावा, अशी सूचना फडणवीस यांनी केली. कचऱ्याचे प्रमाण, उपलब्ध जागा, तंत्रज्ञानाची उपयुक्तता आणि गॅस पाइपलाईनचे अंतर या बाबी विचारात घेऊन प्रकल्पांचे नियोजन करण्याची गरज आहे. या क्षेत्रातील कंपन्या, तेल कंपन्या आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या सहभागातून अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित करावी. या प्रकल्पांमुळे कचरा उचलण्यासाठी महापालिकांना करावा लागणारा खर्च वाचणार असून कचरामुक्त शहरांच्या उद्दिष्टाला चालना मिळेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. या बैठकीला नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे, नगरविकास विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक सौ. रंजन शांतिलाल रावल, सदर मिळकतीसंदर्भात खाली दिलेली कागदपत्रे गहाळ झाली असल्याचे विद्यमान मालकांनी सांगितले आहे. सदर मिळकतीसंदर्भात गहाळ झालेली कागदपत्रे – १) दि. १५.०५.२००० रोजीचे मा. दुय्यम निबंधक हवेली नं. २ यांचे कार्यालयात अ. क्र. ३१२१/२००० नुसार नोंदविलेले डीड ऑफ अपार्टमेंट दस्ताची मूळ दस्त, मूळ रजिस्ट्रेशन रिसिट व मूळ सूची २, २) दि. २०.०९.१९९९ रोजीचे मा. दुय्यम निबंधक हवेली नं. २ यांचे कार्यालयात अ. क्र. छा. ८९०/१९९९ नुसार नोंदविलेला करारनामा दस्ताची मूळ सूची २. विद्यमान मालकांनी सदर मिळकत सर्वार्थाने निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व हमी देऊन सदर मिळकत आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केले आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही मालकी हक्क, गहाण, दान, लीज, लीन, बक्षीस, भाडेपट्टा, करार मदार इत्यादी किंवा अन्य कोणत्याही प्रकारचा बोजा हक्क किंवा हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अस्सल कागदपत्रांनिशी आमची खात्री पटवून द्यावी. त्यानंतर कोणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही किंवा हक्क व हितसंबंध असलेल्या व्यक्तींनी आपले हक्क व हितसंबंध जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल याची दखल घ्यावी.

**मिळकतीचे परिशिष्ट :** गाव मौजे सोमवार पेठ पुणे येथील सिटी एस नं. ३२४, या मिळकतीवर बांधलेल्या कुशाल को ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि. या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०१ यांसी क्षेत्र ५१.३७ चौ.मी. बिल्टअप ही मिळकत.

**पुणे, दिनांक : १३.१०.२०२६**

**धनराज संभाजी माने, ॲडव्होकेट, बी.कॉम.एलएल.बी.**
**शॉप नं.१बी, ओम गणेश अपार्टमेंट, २०६, शुक्रवार पेठ,**
**पुणे-४११००२, फोन : ८८८८१९९३३८/८८३०५८५१४८**



महावितरण

## ई-निविदा सूचना

कार्यकारी अभियंता, महावितरण, पर्वती विभाग, पु.ल. देशपांडे गार्डन जवळ, सिंहगड रोड, पुणे ४११०३० येथे विविध कामांसाठी महावितरणकडे ई-नोंदणीकृत कंपन्यांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.

| नं. | ई-निविदा क्र. | तपशील | निविदा रक्कम लाख |
|---|---|---|---|
| १) | EE/PRD/T-11/2026-27 | पर्वती विभागाअंतर्गत येणाऱ्या विविध कार्यालये आणि उपकेंद्रांच्या कार्यालयीन इमारती आणि आजूबाजूच्या परिसराची देखभाल करण्यासाठी हाऊसकीपिंगची कामे पुरवणे पूर्ण्या साठी ई-निविदा | १० लाख |

बोली कागदपत्रे आमच्या वेबसाइट http://works.mahadiscom.in/eTender/etender वर १४.१०.२०२६ ते २१.१०.२०२६ पर्यंत उपलब्ध आहेत.

PRO/PZ/150/2026-27 कार्यकारी अभियंता, पर्वती विभाग


# महामार्गांवरील अपघातग्रस्तांसाठी हवाई रुग्णवाहिका

**मुंबई, (प्रतिनिधी) :** राज्यातील महामार्गांवर होणाऱ्या गंभीर रस्ते अपघातांमध्ये जखमींना वेळेत उपचार मिळावेत आणि विलंबामुळे होणारे मृत्यू टाळता यावेत, यासाठी राज्य सरकार हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याच्या तयारीत आहे. अपघातानंतरचा पहिला तास अर्थात 'गोल्डन अवर' निर्णायक ठरत असल्याने या काळात जखमींना तातडीने ट्रॉमा केअर सेंटरमध्ये पोहोचविण्यासाठी ही सेवा उपयुक्त ठरणार आहे. समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्गावर या सेवेला प्राधान्य देण्यात येणार असून, नवीन वर्षाच्या सुरुवातीला ही सेवा सुरू करण्याचे नियोजन असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी दिली.

हवाई रुग्णवाहिका प्रकल्पासंदर्भात सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी बैठक आयोजित केली होती. या बैठकीला आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, गृहराज्यमंत्री योगेश कदम, परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, आरोग्य विभागाचे संचालक संजय काटकर, वाहतूक पोलीस विभागाचे अधीक्षक डॉ. सुनील भारद्वाज यांच्यासह परिवहन, आरोग्य आणि पोलीस विभागांतील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. प्रकल्पाच्या अंमलबजावणीसाठी १५ नोव्हेंबरपर्यंत प्रमाणित कार्यपद्धती (एसओपी) तयार करून तिला मंजुरी घेण्यात येणार आहे. त्यानंतर नोव्हेंबरअखेर उच्चाधिकार समितीची मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल. या प्रक्रियेनंतर नवीन वर्षाच्या सुरुवातीला हवाई रुग्णवाहिका सेवा सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे, असे सांगत सरनाईक यांनी संबंधित विभागांना ही प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

### तीन प्रमुख महामार्गांवर विशेष यंत्रणा

राज्यात दरवर्षी सुमारे १५ हजार रस्ते अपघात होत असल्याची माहिती देण्यात आली. गंभीर अपघातांनंतर वाहतूक कोंडी, रुग्णालयापर्यंतचे अंतर आणि तातडीच्या वैद्यकीय सुविधांची अनुपलब्धता यामुळे उपचार मिळण्यास विलंब होतो. ही परिस्थिती लक्षात घेऊन समृद्धी महामार्ग, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग आणि मुंबई-गोवा महामार्गावर अपघातग्रस्तांना जलद वैद्यकीय मदत मिळण्यासाठी विशेष यंत्रणा उभारण्यात येणार आहे.

या सेवेसाठी ट्रॉमा केअर सेंटरचे जाळे निश्चित करणे, हवाई रुग्णवाहिका पुरविणाऱ्या सेवा पुरवठादारांचे पॅनेल तयार करणे आणि जखमींना सुरक्षितपणे रुग्णालयात पोहोचविण्याची कार्यपद्धती निश्चित करणे यावर भर दिला जाणार आहे.

## केसरी शब्दकोडे क्र. २०१

**आडवे शब्द –** १) देश सोडून पळून गेलेला ४) संतोष, आनंद ७) दारूचा एक प्रकार ८) दहा तोंडाचा रावण ११) राजा, राणी आणि XXX खेळाच्या पत्त्यातील एक चित्र १२) वस्त्र १३) कर्जाच्या रकमेवर सावकाराला दिली जाणारी रक्कम १४) पार्वतीचे एक नाव १६) मावा १८) भूपती १९) परमेश्वर २०) पाय २२) चळत, रास २४) दरोडा २६) ओरखडा २७) पाण्याच्या उगमाची जागा २९) शुद्ध झालेला, पवित्र ३१) हालचाल ३४) बारीक झणझण ३६) नातेवाईक ३७) पद्धतीप्रमाणे ३८) निद्रा, झोप ३९) छोटा, लहान मठ.



**उभे शब्द –** १) फुले गोळा करण्याची छोटी टोपली २) सीतापती ३) नवरा ४) वर्ष ५) माणुसकी ६) माणूसघाणा, मत्सरी ९) सावळा ११) कष्टाचा निर्वाह १५) चढ्या बोलीने माल विकण्याचा प्रकार १७) नृत्य २१) रात्र २२) पृथ्वीवरील सर्व भाग २३) बाराचा समूह (इं) २५) अरण्य २८) तांबड्या रंगाचा समुद्रातील मासा २९) पूजा करणारा ३०) एक वन्य पशू ३२) सीताफळांची एक जात ३३) घोड्यांच्या तोंडात घालण्याची शृंखला ३५) नवरदेव

*सुभाष पानसे*

### शब्दकोडे क्र. २०० चे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कि | ल | बि | ल | | अं | गा | व | र | का | टा | उ | भा | रा | ह | णे |
| र | व | | का | ट | क | | र्ण | | न्हा | | ड | | ख | र | |
| ण | | फ | की | र | | व | सं | त | | नि | वा | र | ण | | मो |
| बे | ग | ड | | | हा | ट | क | | शो | | उ | ट्टे | | ठे | का |
| दी | | शा | का | हा | र | | र | | पा | क | ड | | अ | | ट |
| | शी | | सा | | जी | त | | पा | | | वी | र | मा | ता | |
| क्ष | ण | भ | र | | त | न | म | न | ध | न | | त | व | | र |
| ण | | क | | दे | | या | | म | स | | अ | | स | व | ड |
| भं | ग | | पा | ठ | क | | ग | ळा | | ले | प | न | | सा | त |
| गू | | खो | टी | | व | ऱ्हा | ड | | श | | श | री | र | | रा |
| र | ज | | ल | बा | डी | | द | श | मी | | ब्द | | ज | ळा | ऊ |
| | व | श | | ळ | | क | | त्रु | | च | | नि | त | | त |
| ठो | स | | प्र | | क | व | च | | अ | र | वा | र | | मु | |
| क | | म्हा | ता | र | च | ळ | | मौ | ल | वी | | ख | ल | ब | त |
| ता | प | | र | ज | क | | अ | ज | ब | | वि | णे | | ल | |
| ळा | | बा | णा | | च | ऱ्हा | ट | | त | | धु | | फुं | क | णी |

# मालमत्ता नुकसानीत विमा कंपनीच्या अटींचे पालन गरजेचे...

एखाद्या मालमत्तेचा, आगीचा विमा काढला जातो त्यावेळी दुर्घटना घडल्यानंतर काय केले पाहिजे याबाबतचे नियम व अटी समजून न घेतल्यास पॉलिसीचे सर्व लाभ जप्त होतात व संबंधित नुकसान कितीही कोटींचे असले तरी त्यात भरपाई एक रुपयादेखील मिळत नाही, हे स्पष्ट करणारा निकाल नुकताच सर्वोच्च न्यायालयाने मागील आठवड्यात दिला.

सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती संजय कुमार व न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांचे खंडपीठाने न्यू इंडिया इश्यूरन्स कंपनी लि. विरुद्ध हेमकुंड डुप्लेक्स अँड बोर्ड प्रा.लि. २०२६ ० सी जे (एस सी) ७८९ या दिवाणी अपिलामध्ये विमा कंपनीचे अपील मंजूर करीत राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाने मंजूर केलेल्या खटल्याच्या खर्चासह एकूण २ कोटी ४४ लाख रुपयांची नुकसानभरपाई रद्द केली आहे. विमाधारकाने अटींचे उल्लंघन केल्याचा निष्कर्ष काढून सर्वोच्च न्यायालयाने विमा कंपनीचे अपील मंजूर केले आहे.

हेमकुंड डुप्लेक्स अँड बोर्ड प्रा. लिमिटेड या कंपनीने २००५ मध्ये एक आजारी कारखाना ताब्यात घेतला व कच्चा माल म्हणून टाकाऊ कागद, बोर्ड, तागाच्या पिशव्या गवत औषधाची वेस्टेन पॅकेजिंग साहित्य जुना कचरा इत्यादींचा वापर करून कागदी पुठ्याचे उत्पादन सुरू केले. कारखान्यात एक मोकळे आवार व तीन गोदामे होती. त्याने आपला माल व इमारतीच्या दोन स्वतंत्र विमा पॉलिसी या न्यू इंडिया इश्यूरन्स कंपनीकडे उतरवल्या होत्या. मालासाठी १३ कोटी रुपयांचा विमा होता, तर संयंत्र व यंत्रसामग्रीसाठी अग्नि सुरक्षा पॉलिसी १४ कोटी रुपयांची होती. मुदत २८ फेब्रुवारी २००९ ते २७ फेब्रुवारी २०१० अशी होती. दरम्यान ७ मे २००९ रोजी विमा धारकाच्या कारखान्यातील टाकाऊ कागदाच्या आवारात आग लागली. त्यात कच्च्या मालाचे व पत्र्याच्या शेडचे नुकसान झाले म्हणून त्याने विमा कंपनीकडे ७ कोटी ३१ लाख ३१ हजार ९६ रुपयांच्या नुकसान भरपाईसाठी दावा दाखल केला. विमा कंपनीने अपघातस्थळाचे सर्वेक्षण करण्यासाठी प्राथमिक सर्वेक्षकाची नियुक्ती केली. त्यांनी सर्वेक्षण करून अहवालात हेतू पुरस्कर आग लावण्याची व काल्पनिक नुकसानीची शक्यता नाकारण्यासाठी सखोल चौकशी करणे आवश्यक आहे, असा अभिप्राय दिला. मालमत्ता व इमारतीचे नुकसान अंदाजे ५६ लाख ४६ हजार ६८१ इतके असल्याचे सांगितले. त्यांच्या अभिप्रायानुसार रॉयल असोसिएट्स या गुप्तहेर संस्थेला कंपनीने पाचारण केले. त्यांच्या अहवालानुसार आगीची तारीख व वेळ खरी वाटत होती; मात्र आगीचे कारण स्पष्ट नव्हते, पत्र्याचे शेड कारखान्याच्या निर्जन ठिकाणी होते. आवारात धूम्रपानास मनाई असल्याने गोदामात कोणीही पेटलेली बिडी, सिगारेट टाकण्याची शक्यता नव्हती. कारखान्याभोवती पूर्ण उंचीची संरक्षक भिंत होती. आग लागल्यानंतर एका तासाने अग्निशामक दलाला कळवण्यात आले; मात्र विमाधारकाने कोणालाही पाठवण्याची तसदी घेतली नाही. या निष्कर्षांच्या आधारे कंपनीने पॉलिसीच्या अटी व शर्तीनुसार दाव्यावर कारवाई करण्याचा सल्ला देण्यात आला.

त्यानंतर विमा कंपनीने आदिती कन्सल्टंट प्रा.लि. यांची अंतिम सर्वेक्षक म्हणून नियुक्ती केली. त्यांच्या अहवालामध्ये पर्यवेक्षक अनिल कुमार यांनी दि. ७ मे २००९ वाजता दुपारी १ वा. ३५ मिनिटांनी आग पाहिल्याचा दावा केला व त्यांनी उपाध्यक्ष गगनदीप सिंग यांना मोबाइलवरून माहिती दिली. पर्यवेक्षकाच्या मते फायर हायड्रंटमध्ये एक होज पाइप जोडण्यात आला होता व आग विझवण्याचा प्रयत्न केला. उपाध्यक्ष गगनदीप यांनी दावा केला की, ते तात्काळ वेस्ट पेपर यार्डमध्ये आले व वाटेत त्यांनी अग्निशमन दलाला कॉल करण्याचा प्रयत्न केला; परंतु तो लागला नाही. त्यानंतर त्यांनी कार्यालयातील एका व्यक्तीला मोबाइलवरून फोन केला व त्याला लँडलाइनवरून अग्निशामक दलाला फोन करण्यास सांगितले, तथापि त्या दिवशी लँडलाईन चालू नव्हती. त्यानंतर उपाध्यक्षांनी अग्निशामक दलाच्या अधिकाऱ्यांचा मोबाइल नंबर शोधून काढला व मदत मागितली व अग्निशमन दल २ वाजून ३६ मिनिटांनी घटनास्थळी पोहोचले. अग्निशमन केंद्रापासूनचे अंतर सात किलोमीटर असल्याचे नमूद केले व आगीचे कारण अज्ञात होते.

टाकाऊ कागदाच्या आवारात विजेचे कनेक्शन नव्हते, त्यामुळे शॉर्ट सर्किटमुळे आग लागण्याची शक्यता नाकारण्यात आली. या अहवालात इतक्या मोठ्या प्रमाणात माल जळतो तेव्हा शेड पूर्णपणे उद्ध्वस्त होऊन मधोमध कोसळले असते व मध्यभागी पत्रे उडून पडले असते; परंतु पत्र्याच्या स्थितीवरून तसे वाटत नव्हते. त्यातील काही पत्रे काळेही पडले नव्हते. तसेच आगीच्या काही दिवसांपूर्वी जेसीबीच्या साहाय्याने शेड पाडण्यात आले होते.




अॅड.जी.एम. आळंदीकर
बारामती, मो.९४२३०२०२५५

मालाचे व इमारतीचे नुकसान ४६ लाख ९ हजार ७२२ इतके निश्चित करण्यात आले. दावा फुगवण्यासाठी हिशोबाच्या पुस्तकात फेरफार केल्यामुळे झालेल्या नुकसानीपेक्षा लक्षणीयरित्या जास्त रकमेचा दावा दाखल केला. आगीचा अपघात कसा झाला याबाबत एकही पुरावा मिळाला नाही.

विमा कंपनीने हिशोबाच्या पुस्तकातील फेरफार करण्याचा प्रयत्न केल्याबद्दल अहवालानुसार पॉलिसी अट क्रमांक ६ चे उल्लंघन झाले, आग लागण्यापूर्वी पत्र्याचे शेड पाडण्यात आले होते व शॉर्टसर्किटमुळे आग लागण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे आधीच कारण संशयास्पद होते व अग्निशमन दलाला एक तास उशिरा माहिती देण्यात आली, स्टॉकची नोंद योग्य नव्हती, उत्पन्न काल्पनिक होते, व्यवहारांच्या नोंदी पुस्तकात नव्हत्या त्यामुळे पॉलिसी अट क्रमांक ८ चे स्पष्ट उल्लंघन होते. ज्यामध्ये दाव्याच्या समर्थनार्थ केलेल्या खोट्या घोषणामुळे पॉलिसीअंतर्गत असलेले सर्व लाभ जप्त होण्याबद्दल सांगितले होते, असा बचाव केला. प्रतिवादीला व्यवसायात तोटा होत होता व व्यापाराशी संबंधित नसलेल्या सट्टेबाजीतून उत्पन्न दाखवून तो नफा जाहीर करत असल्याचे दिसून आले.

यावर राष्ट्रीय ग्राहक तक्रार निवारण आयोगाने आगीचे कारण अज्ञात असल्याने प्रतिवादीवर त्याचे कारण व सत्यता सिद्ध करण्याची जबाबदारी नव्हती, शिवाय माहिती देण्यास हेतू पुरस्कर विलंब केला नव्हता, असा निष्कर्ष काढला व विमा कंपनीने २ कोटी ४० लाख रुपये ४५ दिवसांच्या आत विमाधारक कंपनीला द्यावे व प्रत्यक्ष रक्कम मिळेपर्यंत १२ % प्रति वर्ष दराने व्याज द्यावे, अवाजवी विलंबाबद्दल ३ लाख नुकसान भरपाई तसेच खटल्याचा खर्च एक लाख देण्यात यावा, असा निर्णय दिला.

त्यावर विमा कंपनीने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील खंडपीठाने सर्व अहवालाचा विचार करून व दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून स्पष्ट केले की, विमाधारक कंपनी सातत्याने आपली भूमिका बदलत होती. माध्यमांना १५ कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचे कळवले, तर विमा कंपनीला १० कोटीचे नुकसान झाल्याचे कळवले. तर अर्जात ८.४५ कोटी नमूद करून ७.३१ कोटीपर्यंत कमी करण्यात आले. आगीच्या उगमासाठी कोणतेही विद्युत कनेक्शन किंवा संभाव्य कारण दिसून आले नाही. यावरून असे सिद्ध होते की, २५% क्षेत्रात सामानाची रचणूक नव्हती. नुकसानीची आकडेवारी व खरेदीची बिले यात पूर्ण विसंगती आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार फक्त टाकाऊ कागदाचा निरुपयोगी साठा तिथे ठेवला होता. वापरता येण्यासारखा कच्चा माल पक्क्या गोदामामध्ये राहत असे. अवघ्या सात किमी अंतरावर अग्निशमन दल केंद्र असताना एक तास माहिती देण्यास झालेला विलंब, पत्र्याच्या तुकड्यावर काळे डाग वगैरे परिणाम न दिसणे, साठ्यातील विसंगती सर्व बाबी संशयास्पद आहेत, तसेच आगीचे कोणतेच कारण स्पष्ट होत नाही. आग विझवण्यासाठी वापरलेली पद्धत संशयास्पद होती. साठवलेला माल निरुपयोगी व कालबाह्य झालेला होता. कच्च्या मालात घट व उत्पादनात असामान्य वाढ याद्वारे गंभीर विसंगती स्पष्ट होते. सर्वोच्च न्यायालयाने एका खटल्यात पहिल्या सर्वेक्षकाचा अहवाल न स्वीकारण्यामागे व दुसऱ्या सर्वेक्षणाच्या नियुक्तीचे कारण विमा कंपनीने स्पष्ट केले पाहिजे, असे सांगितले; मात्र या खटल्यात पहिल्या अहवालात संशयास्पद बाबींची सखोल चौकशी करण्यात यावी, असा अभिप्राय दिला.

विमा कंपनीने तिच्या अटींमध्ये नमूद केल्याप्रमाणे ६ नंबरला कोणतेही नुकसान झाले असताना तात्काळ कंपनीला सूचना द्यावी व १५ दिवसांच्या आत कंपनीने लेखी स्वरूपात परवानगी असलेल्या कंपनीला तपशील द्यावा. हानीसाठी लेखी दावा नष्ट झालेल्या वस्तू व मालमत्तेचा नुकसानीच्या रकमेचा तपशीलवार हिशोब असावा, इतर सर्व विमा असेल तर त्याचा तपशील असावा. पुस्तके, खरेदी बिले, पावत्या सर्व कंपनीला सादर कराव्यात असे नसल्यास पॉलिसीअंतर्गत कोणताही दावा देय राहणार नाही. तसेच अट क्रमांक ८ मध्ये कोणतेही खोटे निवेदन करू नये, फसवणुकीची साधने किंवा युक्त्या वापरल्या असतील, तर पॉलिसीअंतर्गत असलेले सर्व लाभ जप्त केले जातील. वह्या पुस्तकातील फेरबदल व वेळेत कंपनीला न कळवणे तसेच किमान ती आग विझवण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केला गेला नव्हता. या बाबींचा विचार करुन राष्ट्रीय तक्रार निवारण आयोगाचा आधीचा (एनसीडीआरसी)चा नुकसान भरपाई मंजुरीचा आदेश रद्द करून विमा कंपनीने जमा केलेली ५० लाख रुपयांची रक्कम व्याजासह योग्य पोचपावतीसह अपीलकर्त्या विमा कंपनीला परत करावी, असा आदेश देण्यात आले होते.

एकूणच मालमत्तेचा अथवा अग्नि संरक्षणाचा विमा काढला असेल, तर वरील हिशेबपत्रके, वेळेवर कंपनीला सुचित करण्याबाबतच्या अटींचे पालन केले, तरच नुकसानभरपाई मिळू शकते हे दर्शवणारा व प्रत्येक विमा धारकाला मार्गदर्शन करणारा हा निकाल आहे.

## हैदराबादचा त्रिपुरावर डावाने ४० धावांनी विजय

**सिकंदराबाद** : हैदराबादने मंगळवारी येथे एलिट गट 'ब' मधील सामन्याच्या तिसऱ्या दिवशी त्रिपुराचा डावाने आणि ४० धावांनी पराभव केला. या विजयासह हैदराबादने रणजी करंडक २०२६-२७ स्पर्धेत आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली.

वेगवान गोलंदाज तनय त्यागराजन आणि मोहम्मद सिराज यांनी मिळून आठ बळी घेतल्यामुळे हैदराबादने त्रिपुराचा दुसरा डाव १२० धावांत गुंडाळला. दुसऱ्या दिवसाचा खेळ थांबला तेव्हा त्रिपुराची अवस्था सात बाद ९९ अशी होती.

या विजयामुळे हैदराबादला बोनस गुणासह एकूण सात गुण मिळाले.

त्यागराजनने ५२ धावा देत सहा बळी घेत त्रिपुराच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. भारताचा वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजने नऊ षटकांत १९ धावा देत दोन बळी मिळवले. पहिल्या सत्रात त्यागराजनने दुसऱ्या दिवसअखेर नाबाद असलेल्या सेंटू सरकाराला लवकर बाद केले. त्यानंतर त्रिपुराचा डाव फार काळ टिकू शकला नाही.

त्रिपुराने पहिल्या डावात १३४ धावा केल्या होत्या. त्याला प्रत्युत्तर देताना हैदराबादने २९४ धावा उभारून मोठी आघाडी मिळवली होती. हीच आघाडी अखेरीस हैदराबादच्या विजयासाठी निर्णायक ठरली. हैदराबादचा पुढील सामना १८ ऑक्टोबरपासून आंध्रविरुद्ध होणार आहे. त्याचवेळी त्रिपुराचा सामना आसामशी होईल.

## उत्तर प्रदेशचा बिहारवर डावाने २६७ धावांनी धुव्वा

**केरळची फलंदाजी ढेपाळली**

**राजगीर** : उत्तर प्रदेशने बिहारविरुद्ध डावाने आणि २६७ धावांनी दणदणीत विजय मिळवला. पहिल्या डावात ५४० धावांचा डोंगर उभारल्यानंतर उत्तर प्रदेशने भेदक गोलंदाजीच्या जोरावर बिहारला दोन्ही डावांत स्वस्तात गुंडाळले. बिहारचा पहिला डाव १४१ धावांत, तर दुसरा डाव १३२ धावांत आटोपला. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी बिहारच्या फलंदाजीची घसरगुंडी उडाली. चार बाद ८८ धावा अशी स्थिती असताना बिहारने केवळ ४४ धावांत शेवटचे सहा फलंदाज गमावले. त्यामुळे संघाचा डाव लवकर संपुष्टात आला. उत्तर प्रदेशकडून झीशान अन्सारीने चार बळी घेतले, तर करण शर्माने तीन फलंदाजांना माघारी धाडले.

### केरळ अडचणीत

**जमशेदपूर** : दुसरीकडे, केरळच्या फलंदाजीला सुरुवातीच्या भक्कम खेळीनंतर गळती लागली आहे. केरळने ८७ धावांवर पहिला, तर २०४ धावांवर दुसरा गडी गमावला. यादरम्यान अभिषेक पी. नायरने १२६ धावांची शानदार खेळी केली. मात्र, ऑफस्पिनर उत्कर्ष सिंग आणि कौनेन कुरेशी यांनी प्रभावी प्रतिहल्ला करत केरळच्या फलंदाजीला खिंडार पाडले.

## बिशप्स उंड्री, लोयोला, जे. एन. पेटिट यांचे दणदणीत विजय

कौस्तुभ पंचारे, दानिश गोनाल यांची हॅटट्रिक



**पुणे** : बिशप्स को-एड स्कूल (उंड्री), लोयोला हायस्कूल आणि जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूल यांनी प्रतिस्पर्ध्यांवर गोलांचा वर्षाव करत लोयोला फुटबॉल चषक २०२६ स्पर्धेच्या उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. सेंट व्हिन्सेंट्स हायस्कूल आणि विद्या भवन हायस्कूल यांनीही आपापल्या लढती जिंकून उपांत्य फेरीतील स्थान निश्चित केले. लोयोला हायस्कूल, पाषाण येथील मैदानावर सोमवारी झालेल्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यांत बिशप्सच्या कौस्तुभ पंचारे आणि जे. एन. पेटिटच्या दानिश गोनाल यांनी हॅटट्रिक नोंदवत दिवस गाजवला. १४ वर्षांखालील गटात बिशप्स को-एड स्कूल, उंड्री संघाने द कल्याणी स्कूलचा ७-१ असा धुव्वा उडवला. कौस्तुभ पंचारेने (३५, ४०, ४५ मि.) हॅट्रिक नोंदवत विजयात सिंहाचा वाटा उचलला. जेडन डेव्हिडने (३५, ४७ मि.) दोन गोल केले, तर सालिफ बेग (८ मि.) आणि श्रेयान सिंग (३४ मि.) यांनी प्रत्येकी एक गोल नोंदवला. कल्याणी स्कूलकडून अक्षज अगरवालने (४२ मि.) एकमेव गोल केला. याच गटातील अन्य लढतीत लोयोला हायस्कूलने जे. एन. पेटिट टेक्निकल स्कूलचा ६-१ असा फडशा पाडला. विशेष म्हणजे, अगस्त्य बडेने सातव्याच मिनिटाला गोल करून पेटिटला आघाडी मिळवून दिली होती.

## तुळजाभवानी मंदिरात सुरक्षा कर्मचाऱ्याला पोलिसांकडून मारहाण?

**प्रवेशाच्या मुद्द्यावरून वाद**



**सोलापूर, (प्रतिनिधी)** : महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या मंदिरात प्रवेशाच्या मुद्द्यावरून वाद निर्माण झाल्याची घटना समोर आली आहे. मंदिर संस्थानच्या सुरक्षा कर्मचाऱ्याला पोलिस कर्मचाऱ्यांनी मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला असून, या घटनेमुळे मंदिरातील सुरक्षा व्यवस्था आणि कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांच्या परस्पर समन्वयाचा प्रश्न चर्चेत आला आहे.

मंदिरात प्रवेश देण्याच्या मुद्द्यावरून वाद झाला. त्यानंतर मंदिर संस्थानच्या सुरक्षा कर्मचाऱ्याला पोलिसांकडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे. या घटनेत संबंधित सुरक्षा कर्मचारी जखमी झाला आहे. मात्र, नेमका वाद कशामुळे सुरू झाला, संबंधित व्यक्तींमध्ये काय बोलणे झाले आणि मारहाणीच्या आरोपामागील संपूर्ण घटनाक्रम काय होता, याबाबत अधिकृत तपशील उपलब्ध झाला नाही.

विशेषतः नवरात्रोत्सवासारख्या गर्दीच्या काळात सुरक्षा यंत्रणांमधील समन्वय महत्त्वाचा ठरतो.आता या प्रकरणात मंदिर संस्थान प्रशासन, संबंधित पोलिस अधिकारी आणि वरिष्ठ पोलिस प्रशासन काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## राजीव गांधी रुग्णालयाची दुरवस्था; आंदोलनाचा इशारा

**येरवडा** : भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा बोजवारा आणि स्थानिक नागरिकांचे प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी आता थेट जनतेचे न्यायालय उभे केले जाणार आहे. या गंभीर प्रश्नांवर प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि एका मोठ्या जनआंदोलनाची पायाभरणी करण्यासाठी एका विशेष डिजिटल समूहाची निर्मिती करण्यात आली असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते गौरव शिंदे यांनी दिली आहे.

राजीव गांधी रुग्णालय हे येरवडा आणि परिसरातील सर्वसामान्य नागरिकांचे हक्काचे आरोग्य केंद्र आहे. मात्र, गेल्या काही काळापासून येथील अपुऱ्या सुविधा, रुग्णांची होणारी हेळसांड आणि नागरी समस्यांकडे प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष यामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे.

या पार्श्वभूमीवर बोलताना गौरव शिंदे म्हणाले, येरवड्यातील नागरिकांना मूलभूत सोयी-सुविधा आणि उत्तम दर्जाचे उपचार मिळणे हा त्यांचा हक्क आहे. प्रशासकीय अनास्थेमुळे सामान्य जनतेला वेठीस धरले जात आहे. म्हणूनच, सर्व नागरिकांना एकत्र आणून या अन्यायाविरोधात एकजूट करण्यासाठी आम्ही हा ग्रुप तयार केला आहे. रुग्णालयातील आरोग्य सुविधांचा दर्जा सुधारावा आणि स्थानिक प्रश्न मार्गी लागावेत, हाच यामागचा मुख्य उद्देश आहे.

या ग्रुपच्या माध्यमातून येरवड्यातील जागरूक नागरिक एकत्र येत असून, आगामी काळात प्रशासनाला जाब विचारण्यासाठी तीव्र जनआंदोलन उभारले जाईल, असा थेट इशाराही शिंदे यांनी दिला आहे.

## 'मॅगझिन' २३ ऑक्टोबरला चित्रपटगृहात

आपल्या आजूबाजूच्या जगापलीकडे जाऊन आपल्या व्यक्तिरेखांकडे पाहणारे चित्रपट मोजकेच असतात. त्याहूनही कमी चित्रपट असे आहेत, जे आजच्या जेन झी पिढीची अस्वस्थता, कुतूहल, स्वतःची ओळख शोधण्याचा प्रवास आणि घराशी असलेलं गुंतागुंतीचं नातं पडद्यावर मांडण्याचा प्रयत्न करतात._मोठ्या पडद्यावरचा भव्य सिनेमॅटिक अनुभव डोळ्यांसमोर ठेवून साकारलेला 'मॅगझिन' २३ ऑक्टोबरपासून चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे.

शुभम संजय शेवडे लिखित-दिग्दर्शित 'मॅगझिन' चित्रपटाची कथा शहरात वाढलेल्या, सिनेमावर प्रेम करणाऱ्या एका तरुणाभोवती फिरते. तो महाराष्ट्रातील आपल्या मूळ गावी जातो आणि तिथे आलेले काही अनपेक्षित अनुभव हळूहळू त्याचा स्वतःकडे, आजूबाजूच्या जगाकडे आणि 'घर' या संकल्पनेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतात. प्रतीक हंडोरे यांनी पटकथा आणि संवाद लिहिले आहेत. अनेक वर्षांनंतर संगीतकार सलील कुलकर्णी आणि गीतकार संदीप खरे या चित्रपटाच्या निमित्ताने पुन्हा एकत्र आले आहेत. राघव वर्तक, डॉ. निलेश माने, सुदर्शन देशमुख आणि वेदिका कुलकर्णी या नव्या कलाकारांना या चित्रपटातून संधी मिळाली आहे. त्यांच्यासोबत अतुल परचुरे, शिवाजी साटम आणि किशोर कदम हे मराठी चित्रपटसृष्टीतील तीन अनुभवी कलाकारही आहेत.

## पॉवरलिफ्टिंग वर्ल्ड कप स्पर्धेत स्वराजंली गमरेला तीन सुवर्णपदके

**काठमांडू** : नेपाळमधील काठमांडू येथे आयोजित प्रतिष्ठित पॉवरलिफ्टिंग विश्वचषक स्पर्धेत महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. जागतिक स्तरावरील स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व येरवड्यातील स्वराजंली स्वप्नील गमरे हिने कौशल्याच्या जोरावर ४३ किलो वजन गटात ऐतिहासिक कामगिरी करत तीन सुवर्णपदकांवर नाव कोरले आहे. या दैदिप्यमान यशामुळे संपूर्ण देश आणि महाराष्ट्राची मान जागतिक क्रीडापटलावर



अभिमानाने उंचावली आहे.

काठमांडू येथे वर्ल्ड कप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या जागतिक स्पर्धेत वेगवेगळ्या देशांतील मातब्बर आणि नामांकित खेळाडूंनी सहभाग घेतला होता. अशा अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत स्वराजंलीने सुरुवातीपासूनच आपले वर्चस्व राखत स्क्वॅट आणि डेडलिफ्टिंग या दोन्ही क्रीडा प्रकारांमध्ये प्रथम क्रमांक पटकावला आणि सुवर्णपदके आपल्या नावे केली. एकूण सर्वोत्तम कामगिरीत अव्वल ठरल्यामुळे तिने तिहेरी सुवर्ण यश संपादन करून वर्ल्ड कपवर भारताचा ठसा उमटवला.

स्वराजंली हिच्या या ऐतिहासिक आणि प्रेरणादायी सुवर्णभरारीनंतर तिच्यावर क्रीडा क्षेत्रातून, राजकीय वर्तुळातून तसेच तिच्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि क्रीडा रसिकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे. प्रशिक्षक सचिन थोरात यांचेही सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

### आर्थिक साक्षरतेसाठी उपक्रम

भारतीय राष्ट्रीय शेअर बाजार (एनएसई) भारतीय प्रतिभूती आणि विनिमय मंडळाच्या (सेबी) मार्गदर्शनाखाली देशभरात आर्थिक साक्षरता, गुंतवणूकदार शिक्षण आणि गुंतवणूकदार संरक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. गुंतवणूकदार जागरूकता उपक्रमांच्या माध्यमातून नागरिकांना आवश्यक ज्ञान देणे आणि प्रतिभूती बाजारात माहितीपूर्ण, जबाबदार व सुरक्षित सहभागासाठी प्रोत्साहित करणे, हे एनएसईचे उद्दिष्ट आहे. आंतरराष्ट्रीय प्रतिभूती आयोग संघटनेच्या (आयओएससीओ) मार्गदर्शनाखाली दरवर्षी आयोजित होणाऱ्या जागतिक गुंतवणूकदार सप्ताहाची (डब्ल्यूआयडब्ल्यू) ही दहावी आवृत्ती भारतात नुकतीच साजरी झाली. यंदाची संकल्पना 'समजून गुंतवणूक करणे सोपे' अशी होती.

# रविवार पेठेतील सव्वादोन कोटींच्या सोन्याच्या चोरीचा छडा

## घरफोडी करणारे दोघेही नातेवाईक

**पुणे :** रविवार पेठेत दागिने बनविण्याचा व्यवसाय करणाऱ्या एका व्यावसायिकाच्या घरावर डल्ला मारून तब्बल २ कोटी २० लाखांचे सोने लंपास करणाऱ्या दोघांना खडक पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. विशेष म्हणजे, चोरी करणारे दोन्ही आरोपी फिर्यादी राहत असलेल्या इमारतीतच राहणारे नातेवाईक असल्याचे तपासात समोर आले आहे. त्यांच्या ताब्यातून चोरीला गेलेले २ किलो २०० ग्रॅम सोने आणि त्या व्यतिरिक्त आणखी ४६ ग्रॅम सोने हस्तगत केले आहे. कारवाईमुळे कोट्यवधींच्या घरफोडीचा छडा लावण्यात खडक पोलिसांना यश आले आहे.

फिर्यादी हे रविवार पेठेत सोन्याचे दागिने बनविण्याचा व्यवसाय करतात. विविध सराफ व्यावसायिक त्यांच्याकडे दागिने बनविण्यासाठी सोने देत असतात. त्यामुळे त्यांच्या घरी सोन्याचे दागिने आणि सोन्याची बिस्किटे ठेवलेली होती. शनिवारी रविवार पेठेतील त्यांच्या राहत्या घरी फिर्यादी आणि त्यांची पत्नी उपस्थित नसल्याची संधी साधून चोरट्यांनी घराच्या दरवाजाचे कुलूप तोडले. त्यानंतर घरात प्रवेश करून लोखंडी कपाटात ठेवलेले तब्बल २ किलो २०० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आणि सोन्याची बिस्किटे चोरून नेली. चोरीला गेलेल्या सोन्याची किंमत तब्बल २ कोटी २० लाख रुपये आहे. या प्रकरणी खडक पोलिस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

### चोरीच्या सोन्यासह अतिरिक्त ४६ ग्रॅम सोनेही जप्त

पोलिसांनी चोरट्यांकडून



चोरीला गेलेले संपूर्ण २ किलो २०० ग्रॅम सोने हस्तगत केले. त्याचबरोबर अतिरिक्त ४६ ग्रॅम सोनेही जप्त करण्यात आले. जप्त केलेल्या सोन्याची एकूण किंमत २ कोटी २४ लाख ८६२ रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले.

त्यामुळे या गुन्ह्यात चोरीला गेलेल्या मुद्देमालापेक्षाही अधिक सोने हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले. सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि संशयितांच्या हालचालींवर ठेवलेले बारकाईचे लक्ष यामुळे कोट्यवधींच्या घरफोडीचा तपास निर्णायक टप्प्यावर पोहोचला.

### सीसीटीव्ही फुटेजने फोडले घरफोडीचे बिंग

कोट्यवधींच्या चोरीचा तपास सुरू होताच खडक पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तपासादरम्यान फिर्यादी राहत असलेल्या इमारतीखाली दोन संशयित व्यक्ती घुटमळताना दिसून आल्या. पोलिस अंमलदार हेमंत पेरणे, अमित जमदाडे, मयूर भोसले आणि सैफ नदाफ यांनी या संशयितांच्या हालचालींवर लक्ष केंद्रित केले. पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. संशयित हे फिर्यादी राहत असलेल्या इमारतीतच राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी मुस्तफा नजीर शेख (वय-३६, रा. के.जी.एन. कॉम्प्लेक्स, पहिला मजला, रविवार पेठ) आणि सरफराज ऊर्फ आवेज मैनुद्दीन शेख (वय-२२, रा. रविवार पेठ, काच आळी) या दोघांना ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान दोघांनी गुन्ह्यातील सहभागाची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली.

### खडक पोलिसांची धडाकेबाज कामगिरी

ही कामगिरी पश्चिम प्रादेशिक विभागाचे अपर पोलिस आयुक्त राजेश बनसोडे, परिमंडळ-१ चे पोलिस उपायुक्त कृषिकेश रावले आणि फरासखाना विभागाचे सहायक पोलिस आयुक्त सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. वरिष्ठ पोलिस निरीक्षक धनंजय पिंगळे, पोलिस निरीक्षक (गुन्हे) शर्मिला सुतार, श्रेणी पोलिस उपनिरीक्षक राहुल मखरे, पोलिस उपनिरीक्षक जयसिंग दाढे, अशोक खाडे, सहायक पोलिस उपनिरीक्षक संतोष मोहिते, विनोद शिंदे तसेच पोलिस अंमलदार मयूर भोसले, अमित जमदाडे यांच्या पथकाने केली.

# श्रीमंत दगडूशेठ गणपती ट्रस्टच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी

**पुणे :** श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टच्या अध्यक्षपदी महेश सूर्यवंशी यांची सोमवारी एकमताने निवड करण्यात आली. विश्वस्त मंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. ही निवड पाच वर्षांसाठी आहे. तसेच माजी अध्यक्ष सुनील रासने यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.

विश्वस्त मंडळाच्या बैठकीला ट्रस्टचे सुनील रासने, महेश सूर्यवंशी, विद्यमान उपाध्यक्ष माणिक चव्हाण, उपाध्यक्ष डॉ. रामचंद्र परांजपे, सरचिटणीस व आमदार हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, विश्वस्त राजेंद्र गावडे, पराग वांबूरे, रोहित लोंढे आदी



उपस्थित होते. बैठकीनंतर सर्व विश्वस्तांच्या हस्ते गणरायाची आरती करण्यात आली.

१९८४ मध्ये सुवर्णयुग तरुण मंडळाच्या माध्यमातून ते या कार्यात सक्रीय झाले. तर, १९९६ मध्ये सुवर्णयुग तरुण मंडळाच्या कार्यकारिणीवर त्यांची निवड झाली. २००१ मध्ये श्रीमंत दगडूशेठ हलवाई ट्रस्टच्या विश्वस्त पदी त्यांची नियुक्ती झाली होती. त्यानंतर २०१० मध्ये ट्रस्टच्या कोषाध्यक्षपदाचा कार्यभार त्यांनी स्वीकारला. त्यांचे वडील शंकरराव सूर्यवंशी हे श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्टचे संस्थापक कोषाध्यक्ष होते.

२०२२-२४ यासाठी ट्रस्टच्या अध्यक्षपदी माणिक चव्हाण यांनी कार्यकाळ पूर्ण केला. त्यानंतर २०२४-२६ अशा दोन वर्षांसाठी ट्रस्टच्या अध्यक्षपदी सुनील रासने हे कार्यरत होते. आता २०२६-३१ या पाच वर्षांसाठी महेश सूर्यवंशी हे अध्यक्षपदाची धुरा सांभाळणार आहेत. तर, २०३१-३६ या त्यापुढील पाच वर्षांसाठी हेमंत रासने हे ट्रस्टचे अध्यक्षपद भूषवणार आहेत.

# एआयच्या युगात मानवी विवेकाचे महत्त्व कायम

## डॉ. एन. नागराजू यांचे प्रतिपादन

**पुणे :** कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात माहिती मिळविणे आणि उत्तरे तयार करणे अधिक सुलभ झाले असले, तरी सत्य आणि असत्य यांतील फरक ओळखणे, चिकित्सक विचार करणे आणि नैतिक निर्णय घेणे यांसाठी मानवी क्षमता तितकीच महत्त्वाची आहे. त्यामुळे भविष्यातील विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाच्या वापरासोबतच विद्यार्थ्यांमध्ये मानवी विवेक, नैतिक जाणीव आणि स्वतंत्र विचारक्षमता विकसित करण्यावर भर द्यावा, असे प्रतिपादन इंग्लिश अँड फॉरेन लँग्वेजेस विद्यापीठाचे (ईएफएलयू), हैदराबादचे कुलगुरू प्रा. डॉ. एन. नागराजू यांनी केले.



भारतीय इंग्रजी भाषा शिक्षक संघटना आणि एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी-एडीटी) विद्यापीठ, लोणी-काळभोर, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २० व्या आंतरराष्ट्रीय आणि ५६ व्या वार्षिक परिषदेच्या उद्घाटन सोहळ्यात ते बोलत होते.

याप्रसंगी ब्रिटिश कौन्सिलचे उपसंचालक शॅनन वेस्ट, सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे, केंब्रिज विद्यापीठाचे दक्षिण आशिया संचालक टी. के. अरुणाचलम, एमआयटी-एडीटी विद्यापीठाच्या कार्यकारी संचालक प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोव्होस्ट डॉ. सायली गणकर, डॉ. जॉन वर्गीस, डॉ. एम. एस. झेवियर, प्रदीप सिंग, परिषदेचे मुख्य आयोजक व स्कूल ऑफ होलिस्टिक डेव्हलपमेंटचे (एसएचडी) संचालक प्रा. डॉ. अतुल पाटील, तसेच ELTI चे राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. किशोर सेल्वा बाबू आदी उपस्थित होते.

एआय लेखन, माहितीचे विश्लेषण आणि उत्तरांची पडताळणी करण्यास मदत करू शकते; मात्र ज्ञानाचा शोध घेणे, वास्तव आणि आभास यांतील फरक समजून घेणे, तसेच योग्य-अयोग्याचा विवेकपूर्ण निर्णय घेणे या मानवी क्षमतांना ते पर्याय ठरू शकत नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या परिषदेत भारतातील जवळपास एक हजार इंग्रजी शिक्षक व प्रतिनिधींनी, तसेच नेपाळ, बांगलादेश, इराक, उझबेकिस्तान, मलेशिया आणि थायलंडसह विविध देशांतील ५० हून अधिक आंतरराष्ट्रीय विद्वानांनी सहभाग नोंदविला. या वेळी सहभागी संशोधकांनी आपल्या संशोधनाचे सादरीकरण केले.

याप्रसंगी टी. के. अरुणाचलम, प्रा.डॉ. सुनिता कराड, प्रा. डॉ. राजेश एस. आणि प्रा. डॉ. एन. नागराजू यांच्यासह डॉ. सायली गणकर यांनी देशभरातून आलेल्या इंग्रजी शिक्षक व संशोधकांना मार्गदर्शन केले. डॉ. अशोक घुगे, डॉ. स्वप्निल शिरसाट आणि प्रा. स्नेहा वाघटकर यांनी परिषदेचे सूत्रसंचालन केले.

**वाचनाने बहुश्रुतता येते : पद्मश्री प्रभुणे**

कोणत्याही भाषेत पारंगत होण्यासाठी त्या भाषेतील उपलब्ध साहित्याचे वाचन केले पाहिजे. वाचनाची गोडी आणि सवय लागली की भाषा आपोआप आत्मसात होऊ लागते. वाचनामुळे शब्दसंग्रहासोबतच बहुश्रुतता वाढते. त्यामुळे कोणत्याही विषयावर परखड मत मांडण्याचा आत्मविश्वास व्यक्तीमध्ये निर्माण होतो. भाषेला विज्ञानाची आवश्यकता नसली, तरी विज्ञानाला भाषेची आवश्यकता नक्कीच भासते, असे मत पद्मश्री गिरीश प्रभुणे यांनी व्यक्त केले.

# दुष्काळ निवारणासाठी सांस्कृतिक कार्यक्रमांतून निधी उभारावा : मंत्री उदय सामंत

## पुणे नवरात्रौ महोत्सवाचे उद्घाटन; दुष्काळ निधीसाठी सामंत यांच्याकडून १० लाखांची घोषणा

**पुणे :** राज्यात यंदा दुष्काळाचे मोठे संकट असून, संकटग्रस्त बांधवांना मदत करण्यासाठी पुणेकरांनी पुढाकार घ्यावा. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून दुष्काळ निवारणासाठी भरीव निधी उभारणे गरजेचे आहे. सामाजिक जाणिवेतून प्रत्येकाने या कामात योगदान द्यावे, असे आवाहन उद्योग व मराठी भाषामंत्री उदय सामंत यांनी केले. यावेळी त्यांनी दुष्काळ निवारणासाठी १० लाख रुपये, तर युवासेना पुणे शहराध्यक्ष हेमंत बागुल यांनी पाच लाख रुपये आणि विधान परिषदेच्या माजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी एक लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली.





३२ व्या पुणे नवरात्रौ महोत्सवाचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते गणेश कला क्रीडा रंगमंच येथे झाले. याप्रसंगी ज्येष्ठ गांधीवादी विचारवंत व माजी आमदार उल्हास पवार, माजी, उपसभापती आमदार डॉ. नीलम गोऱ्हे, माजीमंत्री बाळासाहेब शिवरकर, शिवसेना महानगर प्रमुख माजी आमदार रवींद्र धंगेकर, शिवसेना शहर प्रमुख नाना भानगिरे, कर्नाटक मधील आमदार एम जी मुळे, अभिनेत्री श्वेता शिंदे, माजी नगरसेविका लता राजगुरू, नंदा लोणकर, मुख्तार शेख, विरेंद्र कीराड, आयोजक आबा बागुल, जयश्री बागुल, युवासेना पुणे शहराध्यक्ष हेमंत बागुल, सुधीर वाघूलीकर, नंदकुमार बानगुडे, घनश्याम सावंत, नंदकुमार कोंढाळकर, रमेश भंडारी, अमित बागुल, सागर बागुल, सागर आरोळे, इम्तियाज तांबोळी, धनंजय कांबळे, अशोक शिंदे, अभिषेक बागुल, गणेश पवार, समीर शिंदे हे उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यात सिनेतारका भार्गवी चिरमुले, वैशाली जाधव, सानिया चौधरी, श्वेता परदेशी, झेबा शेख, डॉ. सुखदा खांडगे, मृण्मयी मोघे, आयली घिया, ऋजुता जुन्नरकर यांची विशेष उपस्थिती देखील होती.

मराठी भाषेच्या संवर्धनावर भर सामंत म्हणाले, 'आबा बागुल यांचे काम गेल्या दीड वर्षापासून जवळून पाहत आहे. त्यांनी दूरदृष्टीतून ई-लर्निंग स्कूल सुरू केले असून, भविष्यात वरिष्ठ महाविद्यालय सुरू करण्याची त्यांची योजना महत्त्वाची आहे. पुणे नवरात्रौ महोत्सवाच्या माध्यमातून बोलीभाषा आणि लोककलांचे जतन करण्याचे काम होत आहे. मराठी भाषेच्या अर्थसंकल्पासाठी सुरुवातीला ५० कोटी रुपयांची तरतूद होती. आता ती ३६० कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. मराठी भाषेचे संवर्धन, जतन आणि प्रसार होणे आवश्यक आहे. त्यासाठी लंडनमध्ये जागतिक मराठी भाषा केंद्र सुरू करण्याचा उपक्रमही महत्त्वाचा आहे.

सांस्कृतिक कार्यक्रम हे पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन आयोजित झाले पाहिजेत. अशा कार्यक्रमांना राज्यकर्त्यांनीही उपस्थित राहिले पाहिजे. पुढील वर्षापासून पुणे नवरात्रौ महोत्सवात ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या नावाने पुरस्कार सुरू करावा, अशी सूचनाही त्यांनी केली.

उल्हास पवार यांनीही बागुल यांच्या सांस्कृतिक उपक्रमांचे कौतुक केले. नगरसेवक म्हणून काम करताना त्यांनी स्वतःच्या मतदारसंघाबरोबरच शहराच्या विकासावर लक्ष केंद्रित केले, असे ते म्हणाले. डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महोत्सवाची परंपरा जपण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रवींद्र खरे यांनी केले, तर घनश्याम सावंत यांनी आभार मानले.

# काश्मीरमध्ये नाना पाटेकर यांच्या नावाने शाळा

## सरहद संस्थेचा संकल्प

**पुणे :** आपल्या अभिनयाने प्रेक्षकांना खिळवून ठेवणाऱ्या नाना पाटेकर यांचे काश्मीरवर विशेष प्रेम होते. काश्मीरमधील शाळेतील विद्यार्थ्यांसाठी त्यांनी काम करण्याचा मानस करून ते सुरुही केले होते. आमची म्हणजेच मयुर मसूरकर तसेच राजू फरांदे यांची मल्हार पाटेकर आणि नाना यांच्याशी प्रत्यक्ष यावर भेट होऊन चर्चाही झाली होती. त्यांच्या अकाली जाण्यानंतर मल्हार तसेच त्यांचे सहकारी हे स्वप्न पूर्ण करण्याचा प्रयत्न करतील याची आम्हाला खात्री आहे, मात्र सरहद संस्थेनेही नाना पाटेकर यांना आदरांजली वाहण्यासाठी त्यांच्या नावाने शाळा सुरू करण्याचा संकल्प केला आहे.

सरहद संस्थेचे समन्वयक जाहीद भट व सलीम रैना यांनी काश्मीरमध्ये नाना पाटेकर यांच्या नावाने शाळा सुरू करण्यासाठी स्वतःची जागा देऊन पुढाकार घेण्याचे ठरविले आहे. मल्हार पाटेकर तसेच त्यांच्या कुटुंबीयांनी यास मान्यता दिल्यास नाना पाटेकर यांच्या नावाने काश्मीरमध्ये शाळा सुरू करण्यात येईल आणि ही नाना पाटेकर यांना खरी आदरांजली ठरेल, अशी माहिती संस्थेचे मयुर मसूरकर आणि राजू फरांदे यांनी दिली.

### ज्येष्ठ नागरिकाची आठ लाखांची फसवणूक

**पुणे :** शासकीय अधिकारी असल्याची बतावणी करून नागरिकांचा विश्वास संपादन करायचा आणि त्यानंतर तांत्रिक क्लृप्त्यांचा वापर करून त्यांच्या बँक खात्यांतील रक्कम लंपास करायची, असा सायबर फसवणुकीचा प्रकार मुंढव्यात उघडकीस आला आहे. घोरपडीतील एका ज्येष्ठ नागरिकाची ८ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी मुंढवा पोलिसात सायबर चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर चोरट्याने फिर्यादी यांना संपर्क करून आपण ईसीआय कार्यालयातील अधिकारी असल्याचे सांगितले. एसआयआर तपासणीदरम्यान फिर्यादी आणि त्यांच्या वडिलांची नावे तसेच कागदपत्रे जुळत नसल्याचे सांगून त्यांना संभ्रमात टाकले. त्यानंतर भामट्याने फिर्यादी यांच्या मोबाईलवर एक लिंक पाठवली आणि ती उघडून आवश्यक माहिती भरण्यास सांगितले.

### ज्येष्ठाला सीनियर सिटिझन कार्डचे आमिष साडेसात लाखांची फसवणूक

**पुणे:** विश्रांतवाडी परिसरातील एका ७४ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला सीनियर सिटिझन कार्ड बनवून देण्याचे आमिष दाखवून त्यांची ७ लाख ८० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी विश्रांतवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीने व्हॉट्सअ‍ॅपच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकाशी संपर्क साधला. सीनियर सिटिझन कार्ड तयार करून देण्याच्या बहाण्याने त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर त्यांच्याकडून क्रेडिट कार्ड तसेच बँक खात्याची माहिती मिळवली. माहिती मिळाल्यानंतर आरोपीने विविध बँक खात्यांमध्ये पैसे हस्तांतरित करून घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. या व्यवहारांमधून फिर्यादीचे एकूण ७ लाख ८० हजार रुपयांचे आर्थिक नुकसान झाले.

### रिक्षेच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**पुणे :** मंगळवार पेठेतील काळावाडा परिसरात रस्ता ओलांडणाऱ्या ३६ वर्षीय व्यक्तीला रिक्षाने जोरदार धडक दिल्याने त्यांचा मृत्यू झाला. अपघातानंतर घटनास्थळी न थांबता आणि पोलिसांना माहिती न देता रिक्षाचालक पळून गेला असून त्याच्याविरुद्ध समर्थ पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला. मंगळवार पेठेतील काळावाडा परिसरात ही दुर्घटना घडली. इरफान मेहबुब शेख (वय-३६, रा. भवानी पेठ, काशेवाडी) हे रस्ता ओलांडत असताना आरोपी रिक्षाचालकाने वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून भरधाव वेगात चालवली.

### बंधन फ्लेक्सी कॅप फंड २१ वर्षांचा झाला

**पुणे :** बंधन फ्लेक्सी कॅप फंडाला २१ वर्षे पूर्ण होत असताना, हा टप्पा केवळ आकड्यांपलीकडे जाऊन, फंडाच्या दृष्टिकोनाला आकार देणाऱ्या गुंतवणूक तत्त्वज्ञानावर चिंतन करण्याची संधी देतो. अशा युगात, जिथे बाजाराचे नेतृत्व झपाट्याने बदलते, गुंतवणूकीच्या पद्धती लोकप्रिय होतात आणि त्यांची लोकप्रियता कमी होते, आणि गुंतवणूकदारांना अनेकदा नवीनतम ट्रेंड्च्या मागे धावण्याचा मोह होतो, तिथे फंडाचा मूळ आधार संतुलन, विविधीकरण आणि अनुकूलन क्षमतेमध्ये रुजलेला आहे. इक्विटी गुंतवणूकीतील सर्वात मोठ्या आव्हानांपैकी एक म्हणजे, बाजाराच्या विविध चक्रांमध्ये कोणतीही एकच गुंतवणूक पद्धत सातत्याने सर्वोत्तम कामगिरी करत नाही. वेगवेगळ्या वेळी, मोमेंटम स्टॉक्सनी सर्वाधिक परतावा दिला आहे, तर इतर काळात व्हॅल्यू, क्वालिटी, ग्रोथ किंवा कमी-अस्थिरतेच्या धोरणांनी आघाडी घेतली आहे. पुढील काही वर्षांत कोणती पद्धत प्रभावी ठरेल याचा अंदाज लावणे, बाजारातील अनुभवी गुंतवणूकदारांसाठीही कठीण असू शकते.

# 'नातेसंबंध विस्कळीत झाल्याने अप्रिय घटना'

**पुणे :** आजच्या गतिमान झालेल्या जगामधे माणूस माणसापासून दुरावत चालला आहे. संवाद कमी होतोय. नातेसंबंध विस्कळित होत आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणून समाजामधे अघटित घटना घडण्याचे प्रमाण वाढत आहे, असे प्रतिपादन डॉ. श्याम बडवे यांनी नुकतेच केले.

पुणे बुक फेअरमध्ये चला कुटुंब संस्था जपूया या विषयावर झालेल्या व्याख्यानात ते बोलत होते.

खून, मारामारी, चोरी, बलात्कार, यांचे प्रमाण वाढत चालले आहे, याकडे लक्ष वेधून डॉ. बडवे म्हणाले, पती-पत्नी नात्यामधील दुरावा वाढत चालला आहे. या सर्वांचे मूळ हे कुटुंब



पुणे पुस्तक जत्रेत डॉ. श्याम बडवे यांचे व्याख्यान झाले. पी.एन.आर राजन यांच्या हस्ते त्यांना स्मृतीचिन्ह देण्यात आले. समन्वयक शिरीष चिटणीस यावेळी उपस्थित होते.

परंपरा विस्कळित होण्यात आहे. या सर्वांसाठी एकच उपाय म्हणजे कुटुंब प्रबोधन हे आहे!

आपल्या व्याख्यानात डॉ. बडवे यांनी अनेक पौराणिक उदाहरणे, संत वचने, उद्बोधक कथा, विनोद यांच्या सहाय्याने सर्व श्रोत्यांना जिंकले. ते म्हणाले, भारतीय संस्कृती ही श्रेष्ठ मानली जाते. ती सनातन म्हणजे सतत बदल स्वीकारली जाणारी, नित्य नूतन बदल घडवणारी आहे, पण समाज मान्यता मानणारी आहे. म्हणून कुटुंब संस्था जपणारी आहे. समन्वयक शिरीष चिटणीस यांनी डॉ. बडवे यांचा परिचय करून दिला. बाबुजी नाटेकर अध्यक्षस्थानी होते. आयोजक एन आर राजन व्यासपीठावर उपस्थित होते.

# एएसएमईच्या मेळाव्यात अभियांत्रिकी विकासावर विचारमंथन

**पुणे :** अमेरिकन सोसायटी ऑफ मेकॅनिकल इंजिनिअर्स इंडियाच्या वतीने पुण्यात एएसएमई महाराष्ट्र सेक्शनच्या वार्षिक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात १८५ हून अधिक अभियंते, उद्योगतज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि विद्यार्थी सहभागी झाले. पायपिंग अभियांत्रिकी, अभिकल्पना, तांत्रिक मानके आणि औद्योगिक क्षेत्राच्या गरजांनुसार कौशल्यविकास या विषयांवर चर्चा झाली. एएसएमई इंडियाचे अध्यक्ष आणि संचालक मधुकर शर्मा यांनी महाराष्ट्राला भारताचे 'मेकॅनिकल डेट्रॉईट' असे संबोधले. अभियंत्यांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण, तांत्रिक समुदायाचे बळकटीकरण, मनुष्यबळ विकास आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र सेक्शन महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी सांगितले. मेळाव्यात विविध तांत्रिक सत्रांचे आयोजन करण्यात आले. डिझाइन डायरेक्शनचे संस्थापक सतीश गोखले यांनी प्रभावी अभिकल्पनेविषयी मार्गदर्शन केले. प्रोटॉन सिनर्जीचे गौरव भेंडे यांनी यांत्रिक अभियांत्रिकीची मूलभूत तत्त्वे आणि पायपिंग प्रणालीतील त्यांचा उपयोग स्पष्ट केला. एअर प्रॉडक्ट्स इंडियाचे पियुष दीक्षित यांनी ताण विश्लेषण आणि मांडणीच्या अनुकूलनावर चर्चा केली.

महाराष्ट्र सेक्शनचे अध्यक्ष अनिल चहर यांनी डिजिटल उत्पादन, स्मार्ट कारखाने आणि इंडस्ट्री ४.० व ५.० या क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्याची भूमिका मांडली. एनप्रो इंडस्ट्रीजचे संस्थापक, अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक श्रीकृष्ण करकरे यांनी तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि उद्योगांमधील सहकार्याचे महत्त्व स्पष्ट केले. मेळाव्याच्या समारोपात सदस्यांचा सहभाग, तांत्रिक शिक्षण आणि उद्योगांशी सहकार्य वाढविण्यासाठीच्या भविष्यातील प्राधान्यक्रमांवर चर्चा करण्यात आली.

आर्थिक परिस्थिती बेताची..तर दुसरीकडे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळविण्याचे स्वप्न..अशा प्रतिकूल परिस्थितीवर जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या बळावर मात करत पोलिस निरीक्षकपदापासून तर सहायक पोलिस आयुक्तपदापर्यंत मजल मारणाऱ्या अनुजा अजित देशमाने यांचा प्रवास संघर्षातून घडलेल्या स्त्रीशक्तीचे प्रेरणादायी उदाहरण आहे. गुन्हेगारांविरोधात कठोर कारवाई, गंभीर गुन्ह्यांची उकल, बेकायदा व्यवसायांविरोधात मोहिमा आणि पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी केलेले प्रयत्न, अशा विविध आघाड्यांवर त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. शारदीय नवरात्रोत्सवाच्या निमित्ताने त्यांच्या कर्तृत्वाचा घेतलेला हा आढावा स्त्रीशक्तीच्या जिद्दीला आणि कर्तव्यनिष्ठेला सलाम करणारा आहे.



# संघर्षमय प्रवासातून अनुजा देशमाने यांची सहायक पोलिस आयुक्त पदापर्यंत झेप!

**शब्दांकन : आशीष रामटेके**

## संघर्षातून यशाकडे...

सिंबायोसिस महाविद्यालयातून बी.कॉम. व एलएलबीपर्यंत शिक्षण पूर्ण करताना अनुजा देशमाने यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेची तयारी करण्यासाठी आवश्यक आर्थिक व्यवस्था करत त्यांनी अभ्यासही सुरू ठेवला. सुरुवातीला पोलिस सेवेत जाण्याचा विचार नसतानाही समाजातील गुन्हेगारीच्या घटना आणि अन्यायग्रस्तांची अवस्था पाहून पीडितांना न्याय मिळवून देण्याची भावना त्यांच्या मनात निर्माण झाली. त्यातूनच पोलिस दलात जाण्याचा निर्णय त्यांनी घेतला. पहाटे साडेपाच वाजता उठून हनुमान टेकडीवर शारीरिक सराव आणि दिवसभर अभ्यास, अशा कठोर दिनक्रमातून त्यांनी स्वतःला घडविले. पहिल्याच प्रयत्नात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश मिळवत त्यांनी पोलिस निरीक्षकपदाला गवसणी घातली.

## विविध जबाबदाऱ्या, कर्तृत्वाची छाप

१५ जुलै १९९२ रोजी मुंबईतील दादर येथे पोलिस निरीक्षक म्हणून सेवेत दाखल झाल्यानंतर त्यांनी पुणे, ठाणे ग्रामीण आणि गुन्हे अन्वेषण विभागात विविध जबाबदाऱ्या सांभाळल्या.

स्वारगेट, सहकारनगर, वारजे तसेच वाहतूक विभागात काम करताना त्यांना विविध स्वरूपाच्या गुन्ह्यांचा आणि कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नांचा अनुभव मिळाला. सीआयडीमध्येही त्यांनी महत्त्वपूर्ण सेवा बजावली. सन २०२४ मध्ये फरासखाना विभागात सहाय्यक पोलिस आयुक्त म्हणून रुजू झाल्यानंतर सराईत मोबाईल चोर, घरफोडी करणारे आरोपी, दरोडेखोर आणि गंभीर गुन्ह्यांतील आरोपींविरोधात कारवाई करण्यावर त्यांनी भर दिला. बेकायदा घुसखोरी, अवैध देहविक्री व्यवसाय आणि सराईत तडीपार गुन्हेगारांविरोधातही कायदेशीर कारवाईसाठी त्यांनी प्रयत्न केले.

## नवरात्रातील स्त्रीशक्तीला कर्तृत्वाचा सलाम!

शारदीय नवरात्र म्हणजे शक्ती, धैर्य आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची प्रेरणा ! अनुजा देशमाने यांचा प्रवासही याच गुणांचे दर्शन घडवतो. आर्थिक अडचणींवर मात करून मिळविलेले यश, पोलिस दलातील प्रदीर्घ अनुभव आणि अन्यायग्रस्तांना न्याय मिळवून देण्याची तळमळ हे त्यांच्या कार्याचे महत्त्वाचे पैलू आहेत. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर यशाचे शिखर गाठता येते, हा संदेश अनुजा देशमाने यांचा प्रवास इतरांना सांगून जातो.

## पीडितांना न्याय, गुन्हेगारांवर कायद्याचा बडगा

- महिला आणि बालकांविरोधातील गुन्ह्यांमध्ये पोक्सो कायद्यांतर्गत कारवाई करून पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. मुंबईतील बॉम्बस्फोटांचा अनुभव घेतलेल्या देशमाने यांच्या मते, अशा घटना रोखण्यासाठी पोलिस यंत्रणेने सतत सतर्क राहणे आवश्यक आहे. पोलिस सेवेत प्रामाणिकपणे आणि कायद्याच्या चौकटीत राहून काम करताना नागरिकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केल्याचे समाधान असल्याचे त्या सांगतात.

## पंचांग

बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६, आश्विन. शु. ४, शके १९४८. नक्षत्र : अनुराधा, सूर्योदय ६.३४ मि., सूर्यास्त १८.१५ मि.

## भविष्य

मेष : कुटुंबात प्रेमाचे वातावरण
वृषभ : मातृभक्त राहाल
मिथुन : उच्च शिक्षणाचा लाभ
कर्क : शारीरिक कष्ट होतील
सिंह : वैवाहिक सौख्य लाभेल
कन्या : करमणुकीवर खर्च
तूळ : नोकरीत प्रतिष्ठा मिळेल
वृश्चिक : पदोन्नती संभवते
धनु : धार्मिक ग्रंथांचे पठण
मकर : सत्संग घडेल
कुंभ : राजकारणात यश
मीन : विद्येमुळे लाभ मिळतील

## तपमान

(अंश सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| मुंबई | ३६ | २४ |
| पुणे | ३३ | २० |
| कोल्हापूर | ३३ | २१ |
| नागपूर | ३३ | २२ |
| सोलापूर | ३४ | २१ |

## सोने-चांदी

२४ कॅरेट सोने -१,४७०००रु.
२२ कॅरेट सोने -१,३७०००रु.
चांदी (किलो) - २,६१,०००रू.

## अंडी / चिकन

| | शेकडा | डझन | प्रतिनग |
|---|---|---|---|
| गावरान | १२१० | १५६ | १३ |
| इंग्लिश | ५९२ | ८४ | ७ |
| चिकन | २५० किलो | | |
| बोनलेस | ३५० किलो | | |

## परताव्याचे आमिष दाखवून फसवणूक

**पुणे :** सॅमको कंपनीच्या शेअर ट्रेडिंगमध्ये गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने शिवणे परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीची ८ लाख ९३ हजारांची मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी सायबर भामट्याविरुद्ध वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. अद्याप कोणालाही अटक झालेली नाही. २४ ऑगस्ट २०२६ ते ९ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत ऑनलाईन माध्यमातून हा प्रकार घडला. सायबर भामट्याने सॅमको कंपनीच्या शेअर ट्रेडिंगमध्ये पैसे गुंतवल्यास फायदा होईल, असे सांगून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादीला वेगवेगळ्या वेळी पैसे हस्तांतरित करण्यास सांगण्यात आले. गुंतवणुकीच्या नावाखाली रक्कम घेतल्यानंतर देखील त्यांना कोणताही परतावा मिळाला नाही.

# एपिलेप्सीग्रस्तांना आधार देणारी संस्था

# संवेदना फाऊंडेशन





## यशोदा वाकणकर यांचा प्रेरणादायी प्रवास

**शब्दांकन : दिलीप तायडे**

शारदीय नवरात्रोत्सव हा स्त्रीशक्तीच्या विविध रूपांचा जागर करण्याचा उत्सव. संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य, इतरांच्या वेदना समजून घेण्याची संवेदनशीलता आणि त्यांचे आयुष्य बदलण्यासाठी सातत्याने काम करण्याची जिद्द यांचा प्रत्यय यशोदा वाकणकर यांच्या कार्यातून येतो. स्वतःच्या एपिलेप्सीच्या अनुभवातून त्यांनी उभारलेले 'संवेदना फाऊंडेशन' या व्याधीसह जगणाऱ्या व्यक्तींसाठी आधाराचे स्थान बनले आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये संस्थेने बावीस वर्षांचा टप्पा पूर्ण केला.

नवरात्रोत्सवानिमित्त यशोदा वाकणकर यांनी 'केसरी'शी बोलताना आपल्या वैयक्तिक प्रवासाची आणि संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. एखाद्या व्याधीवर वैद्यकीय उपचार उपलब्ध असले, तरी तिच्याभोवतीचे गैरसमज आणि सामाजिक पूर्वग्रह दूर करणे हे मोठे आव्हान असते. एपिलेप्सी असणाऱ्या व्यक्तींना उपचारांबरोबरच कुटुंबाचा आधार, समाजाची समजूतदार साथ आणि स्वतःच्या क्षमतांनुसार आयुष्य घडवण्याची संधी आवश्यक असते, असे वाकणकर यांनी सांगितले. याच जाणिवेतून स्वमदत गट, समुपदेशन, औषधांसाठी आर्थिक मदत आणि विवाह जुळवण्यासाठी व्यासपीठ अशा उपक्रमांची उभारणी झाली असल्याचे त्यांनी सांगितले.

### कुटुंबाचा भक्कम आधार

यशोदा या डॉ. अनिल अवचट आणि डॉ. अनिता अवचट यांच्या धाकट्या कन्या. झोपडपट्टीतील महानगरपालिकेच्या शाळेत त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले. पुढील शिक्षणही त्यांनी मराठी माध्यमातून घेतले. वयाच्या सातव्या वर्षापासून एपिलेप्सीचा त्रास सुरू झाल्याचे त्यांनी सांगितले.

बालपणीच्या अनुभवांविषयी बोलताना वाकणकर यांनी आपल्या जडणघडणीत आई-वडिलांच्या पाठिंब्याचे महत्त्व उलडले. योग्य उपचारांबरोबरच व्याधीमुळे व्यक्तिमत्त्वावर किंवा संधींवर मर्यादा येऊ नयेत, याची कुटुंबाने काळजी घेतली. एपिलेप्सी आहे, म्हणून वेगळे वागवण्याऐवजी इतर मुलींप्रमाणे शिकण्याचे आणि स्वतःचे आयुष्य घडवण्याचे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले, असे त्यांनी नमूद केले. व्यक्तीकडे केवळ तिच्या व्याधीच्या चौकटीतून न पाहता तिच्या क्षमता आणि आकांक्षांना महत्त्व देण्याचा हाच दृष्टिकोन पुढे त्यांच्या सामाजिक कार्याचा आधार बनला.

### कलाविश्वातून समुपदेशनाकडे

वाकणकर यांनी व्यावसायिक उपयोजित कलेचे शिक्षण घेतल्यानंतर अनेक वर्षे कलाकार म्हणून काम केले. या काळात अनेक पुस्तकांची मुखपृष्ठे त्यांनी साकारली. पुढे चिकित्सात्मक मानसशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण घेऊन समुपदेशनाच्या क्षेत्रात प्रवेश केल्याची माहिती त्यांनी दिली. सध्या त्या 'संवेदना फाऊंडेशन'च्या संस्थापक-संचालिका म्हणून कार्यरत आहेत. तसेच दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात एपिलेप्सी समुपदेशक म्हणूनही काम करतात. कलेची पार्श्वभूमी, मानसशास्त्राचे शिक्षण आणि व्याधीचा स्वतःचा अनुभव या तिन्हींची सांगड त्यांच्या कामात दिसते.

२००३ मध्ये त्यांच्या मेंदूवर शस्त्रक्रिया झाली. स्वतःच्या उपचारप्रवासात आलेल्या अडचणी आणि एपिलेप्सीशी संबंधित सामाजिक प्रश्नांमुळे इतरांसाठी काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे वाकणकर यांनी सांगितले. त्यातून 'संवेदना फाऊंडेशन'ची स्थापना झाली.

### एकटेपणातून संवादाकडे

संस्थेच्या कामाची सुरुवात स्वमदत गटाच्या बैठकांपासून झाली. समान अनुभव असलेल्या व्यक्तींना एकत्र येऊन मन मोकळे करता यावे, आपल्या अडचणी मांडता याव्यात आणि परस्परांना आधार देता यावा, हा त्यामागचा उद्देश असल्याचे वाकणकर यांनी स्पष्ट केले.

या बैठकांमधील संवादातून व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबांच्या गरजा समोर येत गेल्या. अनुभवांची देवाणघेवाण करण्याबरोबरच समुपदेशनाची आवश्यकता असल्याचे लक्षात आल्याने एपिलेप्सी समुपदेशन केंद्र सुरू करण्यात आले.

शाळेतील प्रवेश, मैत्री, रोजगार आणि विवाह अशा आयुष्यातील विविध टप्प्यांवर एपिलेप्सी असणाऱ्या व्यक्तींना गैरसमजांना सामोरे जावे लागते, असा संस्थेचा अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे व्यक्ती आणि कुटुंबांशी संवाद साधण्याबरोबरच समाजात जनजागृती करणे हाही संस्थेच्या कार्याचा महत्त्वाचा भाग बनला आहे.

### विवाहासाठी विश्वासाचे व्यासपीठ

स्वमदत गटातील चर्चांमध्ये विवाहाचा प्रश्न वारंवार समोर येत होता. शिक्षण पूर्ण केलेल्या, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असलेल्या आणि उपचारांमुळे झटके नियंत्रणात असलेल्या व्यक्तींनाही विवाह जुळवताना अडचणी येत असल्याचे त्यांनी सांगितले.

व्याधीची माहिती दिल्यास नकार मिळण्याची भीती आणि माहिती लपवल्यास पुढे नात्यातील विश्वासाला तडा जाण्याची शक्यता, अशा द्विधा परिस्थितीत अनेक व्यक्ती व कुटुंबे अडकत होती. या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी संस्थेने 'एपिलेप्सी विवाह मंडळ' सुरू केले. व्याधीविषयी माहिती लपवण्याऐवजी परस्पर समजूत आणि विश्वासाच्या आधारावर नात्याचा विचार करता यावा, हा या उपक्रमाचा उद्देश आहे. गेल्या दहा वर्षांत आठ वधू-वर मेळावे आयोजित करण्यात आले असून, त्यातून ३० विवाह जुळले आहेत.

### मदतीचा हात

दीर्घकाळ औषधे घ्यावी लागणाऱ्या गरजू व्यक्तींसाठी उपचारांचा खर्च पेलणे कठीण ठरू शकते. ही अडचण लक्षात घेऊन 'एपिलेप्सी औषध मदत योजना' सुरू करण्यात आली आहे. एका गरजू व्यक्तीच्या वर्षभराच्या औषधांचा खर्च स्वीकारण्याचे आवाहन संस्थेने देणगीदारांना केले. या योजनेतून दोनशेहून अधिक गरजू व्यक्तींना नियमित औषध मदत दिली जात असल्याची माहिती त्यांनी दिली.

दर तीन महिन्यांनी मदतीसाठी येणाऱ्या व्यक्तींशी संपर्क होत असल्याने त्यांच्या परिस्थितीची आणि अडचणींची माहितीही संस्थेला मिळते. ही योजना केवळ आर्थिक साहाय्यापुरती मर्यादित नसून, उपचारांचे सातत्य राखण्यासाठी गरजू व्यक्तींच्या पाठीशी उभे राहण्याचा प्रयत्न असल्याचे वाकणकर यांनी स्पष्ट केले.

### सामूहिक कार्याची जोड

स्वतःच्या अनुभवातून सुरू झालेल्या कामाला सहकाऱ्यांच्या सहभागामुळे व्यापक स्वरूप मिळाल्याचे वाकणकर यांनी सांगितले. संस्थेतील इतर स्वयंसेवकांनीही कोणत्या ना कोणत्या प्रकारे एपिलेप्सीचा अनुभव घेतला आहे. त्यामुळे मदतीसाठी येणाऱ्या व्यक्तींच्या अडचणी समजून घेताना अनुभवाधारित संवेदनशीलतेची जोड मिळते. या वाटचालीत सहकारी, स्वयंसेवक आणि देणगीदारांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. संस्थेच्या कार्याला राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर पुरस्कार व मान्यताही मिळाल्याची माहिती त्यांनी दिली.



टिळक महाराष्ट्र विद्यापीठ वित्त विभागातील कर्मचारी वृंद



आनंदिता ग्रुप, चव्हाणनगर, पद्मावती, पुणे



Registered No. PCW/002/2024-2026-S.P.College Post-RNI No. 1755/1957



### कबड्डी चॅम्पियन्स लीगच्या प्रशिक्षकांची घोषणा

**नवी दिल्ली** : कबड्डी चॅम्पियन्स लीगने (केसीएल) मंगळवारी दुसऱ्या हंगामासाठी प्रशिक्षकांची घोषणा केली. आगामी हंगामात १० फ्रँचायझींच्या संघांची धुरा हे प्रशिक्षक सांभाळणार आहेत.

या घोषणेनुसार, कर्नाल किंग्जच्या प्रशिक्षकपदी रविंदर पहल, गुरुग्राम गुरूजच्या प्रशिक्षकपदी जगपाल सिंग, कुरुक्षेत्र नाइट्सच्या प्रशिक्षकपदी अनूप सिंग आणि सोनीपत स्टार्सच्या प्रशिक्षकपदी सुरेंदर नाडा यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे, फरिदाबाद फायटर्सचे प्रशिक्षक म्हणून ओम प्रकाश नरवाल, भिवानी बुल्ससाठी समशेर सिंग, रोहतक रॉयल्ससाठी जगदीप सिंग, हिसार हिरोजसाठी विनोद कुमार शुभग्रो, पानिपत पँथर्ससाठी रणदीप दलाल आणि झज्जर जग्वार्ससाठी रमेश कुमार यांची निवड करण्यात आली आहे. दरम्यान, कबड्डी चॅम्पियन्स लीगने दुसऱ्या हंगामाचे वेळापत्रक अद्याप जाहीर केलेले नाही.

# मालिका विजयाचे भारताचे लक्ष्य

## वेस्ट इंडिजसमोर पुनरागमनाचे आव्हान

**हैदराबाद** : शानदार फॉर्ममध्ये असलेले भारतीय फलंदाज बुधवारी येथे वेस्ट इंडिजविरुद्ध होणाऱ्या चौथ्या टी–२० सामन्यातही धावांचा धडाका कायम राखून विजयासह मालिका जिंकण्याच्या निर्धाराने मैदानात उतरतील. दुसरीकडे, मागील सामन्यात मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागलेल्या वेस्ट इंडिजला मालिकेतील आव्हान कायम राखण्यासाठी पुनरागमन करावे लागणार आहे.

भारत सध्या मालिकेत २–१ ने आघाडीवर असून मालिका खिशात घालण्यासाठी त्यांना केवळ एका विजयाची आवश्यकता आहे. दोन्ही संघांतील सामन्याचा निकाल पुन्हा एकदा त्यांच्या आक्रमक फलंदाजांच्या कामगिरीवर अवलंबून असेल. भारताच्या आघाडीच्या फळीतील संजू सॅमसन, अभिषेक शर्मा आणि ईशान किशन यांनी आतापर्यंत



प्रभावी फलंदाजी केली आहे. आघाडीचे तीन फलंदाज लवकर बाद झाल्यास तिलक वर्मा, नितीश कुमार रेड्डी आणि नमन धीर यांना डावाची जबाबदारी सांभाळावी लागेल.

### गोलंदाजांची कसोटी

भारतीय गोलंदाजांनाही शिस्तबद्ध कामगिरी करावी लागणार आहे. रांची येथे झालेल्या दुसऱ्या टी–२० सामन्यात विजयासाठी दिलेले २५० धावांचे लक्ष्य वेस्ट इंडिजने नऊ चेंडू शिल्लक असताना गाठले होते. इंदूरमधील तिसऱ्या सामन्यात शिमरॉन हेटमायरने ४३, कामिल पूरनने ४२ आणि शमर स्प्रिंगरने नाबाद ३५ धावा करत चांगली झुंज दिली. भारताने या मैदानावर अखेरचा टी–२० सामना २०२४ मध्ये बांगलादेशविरुद्ध खेळला होता. त्या वेळी भारताने सहा बाद २९७ धावा करत १३३ धावांनी मोठा विजय मिळवला होता.

**दोन्ही संघ : भारत :** श्रेयस अय्यर (कर्णधार), ईशान किशन, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), नमन धीर, वैभव सूर्यवंशी, तिलक वर्मा (उपकर्णधार), अभिषेक शर्मा, शिवम दुबे, नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, अर्शदीप सिंग, कुलदीप यादव, प्रिन्स यादव, रवी बिश्नोई, मयंक यादव.

**वेस्ट इंडिज :** शाई होप (कर्णधार व यष्टिरक्षक), ज्वेल अँड्रयू (यष्टिरक्षक), शिमरॉन हेटमायर, आमिर जांगू (यष्टिरक्षक), कामिल पूरन, रोव्हमन पॉवेल, शेरफान रदरफोर्ड, क्वेंटिन सॅम्पसन, रोस्टन चेस, कीमो पॉल, रोमारियो शेफर्ड, शमर स्प्रिंगर, मॅथ्यू फोर्ड, अकील होसेन, शमर जोसेफ, गुडाकेश मोती.

### धावगती रोखण्याचे वेस्ट इंडिजसमोर आव्हान

भारतीय फलंदाजांची धावगती रोखण्याचे मोठे आव्हान वेस्ट इंडिजसमोर असेल. पहिल्या टी–२० सामन्यात कर्णधार श्रेयस अय्यरने शतक झळकावले होते. दुसऱ्या सामन्यात संजू सॅमसन आणि ईशान किशन यांनी मोठ्या खेळी केल्या, मात्र त्या सामन्यात वेस्ट इंडिजने बाजी मारली. तिसऱ्या सामन्यात अभिषेक शर्माने आक्रमक फलंदाजी करत भारतीय संघाच्या विजयात मोलाची भूमिका बजावली. वेस्ट इंडिजचा अष्टपैलू खेळाडू शमर स्प्रिंगर यानेही अभिषेकच्या फॉर्मची दखल घेतली होती.

# शुभमन आणि शेफाली सर्वोत्तम क्रिकेटपटू

**दुबई** : भारतीय कर्णधार शुभमन गिल याची मंगळवारी आयसीसीकडून सप्टेंबर महिन्यातील सर्वोत्तम पुरुष क्रिकेटपटू म्हणून निवड करण्यात आली. गिलने पाचव्यांदा हा पुरस्कार पटकावत नवा विक्रम नोंदवला. दरम्यान, महिला गटात भारताची सलामीवीर शेफाली वर्मा हिला आशिया चषक आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील शानदार कामगिरीसाठी या पुरस्काराने गौरविण्यात आले.

गिलने वेस्ट इंडिजविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत दमदार कामगिरी केली होती. एकाच देशातील पुरुष आणि महिला क्रिकेटपटूंना एकाच महिन्यात हा पुरस्कार मिळण्याची ही पाचवी वेळ आहे. यापूर्वी भारताच्या जसप्रीत बुमराह आणि स्मृती मानधना यांची जून २०२४ मध्ये, तर अभिषेक शर्मा आणि स्मृती मानधना यांची सप्टेंबर २०२५ मध्ये या पुरस्कारासाठी निवड झाली होती.

शुभमन गिलने अभिषेक शर्मा आणि झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा यांना मागे टाकत हा पुरस्कार जिंकला. महिला गटात श्रीलंकेची कर्णधार चमारी



अटापट्टू आणि भारताची फिरकीपटू श्री चरणी यांनाही या पुरस्कारासाठी नामांकन मिळाले होते.

### फलंदाजांच्या क्रमवारीत स्मृती अव्वल

भारताची नवनियुक्त कर्णधार स्मृती मंधाना हिने आयसीसीच्या महिला एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीतील अव्वल स्थान कायम राखले आहे. दरम्यान, ऑस्ट्रेलियाची एलिस पेरी हिने गुरुवारी जाहीर झालेल्या ताज्या क्रमवारीत पहिल्या दहामध्ये पुनरागमन केले आहे.

हरमनप्रीत कौरच्या जागी नुकतीच भारतीय संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती झालेल्या स्मृती मंधानाने ७९० गुणांसह फलंदाजांच्या क्रमवारीत पहिले स्थान कायम राखले आहे. हरमनप्रीत कौर नवव्या स्थानावर आहे. महिला एकदिवसीय गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताची दीप्ती शर्मा एका स्थानाने घसरून नवव्या क्रमांकावर पोहोचली आहे.

महिला टी–२० फलंदाजांच्या क्रमवारीत शेफाली वर्मा चौथ्या, स्मृती मंधानापाचव्या, तर हरमनप्रीत कौर दहाव्या स्थानावर आहे. महिला टी–२० गोलंदाजांच्या क्रमवारीत भारताच्या श्री चरणी आणि दीप्ती शर्मा यांनी पहिल्या दोन स्थानांवर कब्जा केला आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीत दीप्ती शर्मा ही पहिल्या दहामधील एकमेव भारतीय असून, ती चौथ्या स्थानावर आहे. एकदिवसीय अष्टपैलू खेळाडूंच्या क्रमवारीतही दीप्ती सहाव्या क्रमांकावर आहे.

# मुंबईचा चंडीगढवर डावाने विजय



**मुंबई** : तुषार देशपांडेने सोमवारी नोंदवलेली हॅट्ट्रिक आणि मंगळवारी फिरकीपटू शम्स मुलानी व तनुष कोटियन यांनी प्रत्येकी घेतलेले तीन बळी यांच्या जोरावर मुंबईने वानखेडे स्टेडियमवर चंदीगडविरुद्ध दणदणीत विजय मिळवला. मुंबईने हा सामना डावाने आणि १५५ धावांनी जिंकला.

सामन्याच्या चौथ्या दिवशी पहिल्या तासात चंदीगडने काहीसा प्रतिकार केला. अर्जुन आझादने अर्धशतकी खेळी करत संघाच्या डावाला आधार दिला. पाचव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या शिवम भांब्रीनेही ४४ धावा करत झुंज दिली. मात्र, मुंबईच्या गोलंदाजांनी नियमित अंतराने बळी मिळवत चंदीगडच्या फलंदाजीला खिंडार पाडले.

मुंबईने मोठा विजय मिळवला असला, तरी क्षेत्ररक्षणात मात्र संघाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. मुंबईच्या क्षेत्ररक्षकांनी तीन झेल सोडले. मागील हंगामात कर्नाटकविरुद्धच्या उपांत्यपूर्व सामन्यातही अशाच चुकांचा फटका मुंबईला बसला होता. त्यामुळे विजय मिळवूनही क्षेत्ररक्षणातील त्रुटी दूर करण्याचे आव्हान मुंबईसमोर कायम आहे.

### कसोटी मालिकेसाठी डिसिल्व्हा संघात

**कोलंबो**: पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेतील मालिकेसाठी श्रीलंकेने १५ सदस्यीय संघ जाहीर केला आहे. कुसल मेंडिसकडे संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली असून, माजी कर्णधार धनंजय डिसिल्व्हाचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

श्रीलंकेच्या टी–२० आणि एकदिवसीय संघांचे नेतृत्व केलेल्या ३१ वर्षीय कुसल मेंडिसने काही दिवसांपूर्वी धनंजय डिसिल्व्हाच्या जागी कर्णधारपद स्वीकारले. ३५ वर्षीय डिसिल्व्हाने नव्या पिढीतील खेळाडूंना संधी मिळावी, यासाठी कर्णधारपद सोडले होते.

पाथुम निसांकाचाही संघात समावेश करण्यात आला आहे. मात्र, पहिल्या कसोटी सामन्यापूर्वी तो पूर्णपणे तंदुरुस्त झाल्यासच त्याला खेळण्याची संधी मिळेल. गेल्या महिन्यात इंग्लंडमध्ये झालेल्या एकदिवसीय मालिकेदरम्यान त्याला दुखापत झाली होती.

# महाराष्ट्राच्या फलंदाजीला खिंडार

## १७२ धावांची आघाडी; दुसऱ्या डावात पाच फलंदाज बाद

**दिल्ली** : रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत सेनादलाविरूद्ध पहिल्या डावात आघाडी मिळविणाऱ्या महाराष्ट्राला तिसऱ्या दिवशी दुसऱ्या डावात फलंदाजी करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. सेनादलाच्या गोलंदाजांनी अचूक टप्प्यावर मारा करीत महाराष्ट्राच्या आघाडीच्या फलंदाजांना बाद केले. दिवसअखेर महाराष्ट्राने दुसऱ्या डावात २८ षटकांत पाच बाद ६६ धावा केल्या असून, एकूण आघाडी १७२ धावांची झाली आहे. अंकित बावणे आणि सौरभ नवले यांनी नाबाद राहत डाव सावरण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या डावात महाराष्ट्राची सुरुवात अपेक्षेप्रमाणे झाली नाही. पृथ्वी शॉ सात धावा करून बाद झाला, तर सचिन धसला खातेही उघडता आले नाही. सेनादलाच्या अर्जुन शर्माने चार बळी मिळवत महाराष्ट्राच्या फलंदाजीला धक्के दिले. पुलकित नारंगनेही एक गडी बाद केला. या पडझडीनंतर अंकित बावणेने सावध फलंदाजी करीत डावाला आकार देण्याचा प्रयत्न केला. त्याने ६६ चेंडूंत तीन चौकारांच्या मदतीने नाबाद ३२ धावा केल्या. सौरभ नवलेने ४२ चेंडूंचा सामना करीत नाबाद १२ धावा केल्या. या जोडीने दिवसअखेर आणखी गडी बाद होऊ दिले नाहीत.

### पहिल्या डावातील आघाडीचा फायदा

महाराष्ट्राने ३३३ धावसंख्या उभारल्यानंतर सेनादलाला २२७ धावांवर रोखून पहिल्या डावात १०६ धावांची मोठी आघाडी घेतली. दुसऱ्या दिवसाच्या १ बाद ७४ धावसंख्येवरून मंगळवारी पुढे खेळताना सर्व्हिसेसचा डाव ९३.२ षटकांत २२७ धावांत आटोपला.

# ऑस्ट्रेलियाचा दक्षिण आफ्रिकेवर २१४ धावांनी विजय



**डरबन :** जोश हेझलवूडच्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ऑस्ट्रेलियाने पहिल्या कसोटीत दक्षिण आफ्रिकेचा २१४ धावांनी पराभव केला. हेझलवूडने दुसऱ्या डावात सहा बळी घेत विजयात मोलाचे योगदान दिले.

ऑस्ट्रेलियाने दक्षिण आफ्रिकेसमोर ४२१ धावांचे लक्ष्य ठेवले होते. मात्र, यजमानांचा दुसरा डाव २०६ धावांत आटोपला. एडन मार्करमने ७५, डेव्हिड बेडिंगहॅमने ४६, मार्को यान्सेनने ३५ आणि वियान मुल्डरने २९ धावा केल्या. मॅट रेनशॉने दोन, तर मिचेल स्टार्क आणि पॅट कमिन्स यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

ऑस्ट्रेलियाने पहिल्या डावात ३९० धावा केल्या होत्या. प्रत्युत्तरात दक्षिण आफ्रिकेचा डाव २८४ धावांत संपल्याने ऑस्ट्रेलियाला १०६ धावांची आघाडी मिळाली. दुसऱ्या डावात ६ बाद ३१४ धावांवर डाव घोषित करत ऑस्ट्रेलियाने विजयासाठी ४२१ धावांचे आव्हान दिले

### ऑस्ट्रेलिया अव्वल

या विजयामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या गुणतालिकेत ऑस्ट्रेलियाने अव्वल स्थानावरील पकड मजबूत केली. ११ सामन्यांत नऊ विजयांसह ऑस्ट्रेलियाचे १०८ गुण असून, त्याची पीसीटी ८१.८२ टक्के आहे. न्यूझीलंड ५२ गुणांसह दुसऱ्या, तर दक्षिण आफ्रिका ३६ गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे.

# आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय हॉकी संघ जाहीर

**नवी दिल्ली**: पंजाबमध्ये २७ ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबरदरम्यान होणाऱ्या आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेसाठी भारतीय पुरुष संघाची घोषणा करण्यात आली आहे. हरमनप्रीत सिंगच्या नेतृत्व–खालील संघात आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणाऱ्या बहुतांश खेळाडूंना कायम ठेवण्यात आले आहे. दरम्यान, गोलरक्षक कृशन बहादूर पाठकचे संघात पुनरागमन झाले आहे. हरमनप्रीतच्या नेतृत्वाखाली भारताने सलग दुसऱ्यांदा आशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्णपदक जिंकत लॉस एंजेलिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवली होती.

आशियाई क्रीडा स्पर्धा आणि विश्वचषक स्पर्धेतून बाहेर राहिलेल्या पाठकला आता संघात पुन्हा संधी मिळाली आहे. युवा बचावपटू अमनदीप लाकडा आणि मध्यरक्षक आदित्य अर्जुन लालागे यांचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

# रेयांश, अर्जित यांचा मानांकित खेळाडूंना धक्का



**पुणे**: एमएसएलटीए – पीएमडीटीए नवसह्याद्री क्रीडा संकूल चॅम्पियनशीप सिरीज(१२वर्षाखालील)टेनिस स्पर्धेत मुलांच्या गटात रेयांश जगताप, अर्जित बावस्कर यांनी मानांकित खेळाडूंना पराभवाचा धक्का देत उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

ऐम टेनिस अकादमी यांच्यातर्फे शेपिंग चॅम्पियन्स फाउंडेशन्स पुणे यांच्या सहकार्याने आयोजित व एआयटीए, एमएसएलटीए, पीएमडीटीए यांच्या मान्यतेखाली ही स्पर्धा होत आहे. नवसह्याद्री क्रीडा संकूल टेनिस कोर्ट येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत मुख्य ड्रॉमध्ये मुलांच्या गटात दुसऱ्या फेरीत बिगर मानांकित रेयांश जगताप याने तिसऱ्या मानांकित अव्यान घुमरेचा ६–२, ६–३ असा सरळ सेटमध्ये पराभव केला. अर्जित बावस्करने सहाव्या मानांकित रिदित नवलेचा ६–१, ६–१ असा सहज पराभव करून अनपेक्षित निकाल नोंदवला. दुसऱ्या मानांकित श्रेयस चौतमहालने अर्जुन कोगेकरला ६–४, १–६, ६–४ असे तीन सेटमध्ये पराभूत केले. मुलींच्या गटात अव्वल मानांकित इशिता पाटील हिने आयरनी शेखचे आव्हान ६–०, ६–१ असे संपुष्टात आणले. सातव्या मानांकित हृदवी लिमकरने मीरा तहलनचा ७–५, ६–३ असा पराभव करून उपांत्यपूर्व फेरी गाठली.

### लेजेंड्स स्पोर्ट्स क्लब संघाला विजेतेपद

**पुणेः** स्पार्टन क्रिकेट क्लब पुणे तर्फे आयोजित सहाव्या 'स्पार्टन मान्सुन लीग' अजिंक्यपद मिक्स कॉर्पोरेट टी–२० क्रिकेट स्पर्धेत ऐश्वर्य खोपकर आणि अच्युत मराठे यांनी केलेल्या अचूक गोलंदाजीच्या मदतीने लेजेंड्स स्पोर्ट्स क्लबने पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबचा तीन गडी राखून पराभव केला आणि विजेतेपदावर आपले नाव कोरले. सलग दुसऱ्या वर्षी पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबला उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. सिंहगड रोडवरील कोद्रे फार्मस क्रिकेट मैदानावर झालेल्या या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात पुणे रेंजर्स क्रिकेट क्लबने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

# वेंकटेश बिल्डकॉनच्या बावधन येथील 'वेंकटेश सेरेनिक' नवीन निवासी प्रकल्पाचा शुभारंभ

**पुणे :** 'वेंकटेश बिल्डकॉन'ने अवघ्या २५ वर्षांत सहा हजारहून अधिक घरांची निर्मिती केली, हे अभिमानास्पद आहे. आता वेंकटेश बिल्डिकॉनने 'सेरेनिक' आणि इतर प्रकल्पांच्या माध्यमातून दहा हजार घरांचे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून काम करावे आणि आपले नाव पुण्याच्या इतिहासात सुवर्णअक्षरांनी कोरावे, असे गौरवोद्गार मगरपट्टा टाउनशिप प्रकल्पाचे चेअरमन आणि 'क्रेडाई'चे माजी राष्ट्रीय अध्यक्ष सतीश मगर यांनी काढले. वेंकटेश बिल्डकॉनच्या बावधन येथील चांदणी चौकाजवळ उभारण्यातयेणाऱ्या 'वेंकटेश सेरेनिक' या नवीन निवासी प्रकल्पाचा शुभारंभ आणिसेल्स ऑफिसचे उद्घाटन सतीश मगर यांच्या हस्ते रविवार, ११ ऑक्टोबर रोजी पार पडले. यावेळी प्रकल्पाच्या माहिती पुस्तिकेचेही अनावरण करण्यात आले.यावेळी व्यासपीठावर आमदार भीमराव तापकीर, आमदार शंकर मांडेकर, आमदार किरण सामंत, माजी आमदार अतुल बेनके, माजी आमदार कुमारगोसावी, माजी आमदार चंद्रकांत मोकाटे, नगरसेवक



दिलीप वेडेपाटील, नगरसेविका अल्पना वर्पे, नगरसेविका रुपाली पवार, युवानेते विराज भरणे, मराठी बांधकाम व्यावसायिक असोसिएशनचे संस्थापक एस. आर. कुलकर्णी, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रवक्ते उमेश पाटील, वेंकटेश बिल्डकॉनचे सीएमडी अंकुश आसबे, लहूराज आसबे, अरुण राजवाडे, हेमंत गोसावी आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार तापकीर यांनी, नगरसेवक असल्यापासून वेंकटेश बिल्डिकॉन परिवाराशी आपला स्नेह असल्याचे सांगून, दर्जेदार बांधकाम, विचारपूर्वक नियोजन आणि ग्राहकांच्या जीवनात मोलाची भर घालणारी घरे निर्माण करण्याच्या उद्देशाने कंपनीने पुण्यातील बांधकामक्षेत्रात आपली विश्वासार्ह ओळख निर्माण केल्याचे उद्गार काढले तर आमदार मांडेकर यांनी, मुळशीच्या प्रवेशद्वारावर होत असलेल्या नव्या प्रकल्पांमुळे या भागाला वेगळी उंची प्राप्त होत असल्याचे सांगितले. प्रास्ताविक करताना वेंकटेश बिल्डकॉनचे सीएमडी अंकुश आसबे यांनी, 'वेंकटेश सेरेनिक' हा प्रकल्प १० एकर क्षेत्रफळाच्या भूखंडावर दोन टप्प्यांत विकसित होत असून त्यापैकी ३.७५ एकर क्षेत्रफळावर पहिल्या टप्प्यमध्ये मध्ये २८ माजली ३ टॉवर्स त्यामध्ये २ आणि ३ बीएचकेचे ऐकून५५० सदनिका आणि १३ शोरूम्सचे नियोजननियोजन करण्यात आलेआहे. प्रकल्पामध्ये सुमारे ४०,००० चौरस फुटांच्या इनडोअर आणि आउटडोअर सुविधांसह सहा स्तरांवरील पार्किंगची व्यवस्था नियोजितआहे. स्विमिंग पूल, व्यायामशाळा, जॉगिंग ट्रॅक, मुलांसाठी खेळण्याची जागा, योग आणि ध्यानधारणेसाठी स्वतंत्र जागा, को–वर्किंग लाउंज तसेच हिरव्यागार मोकळ्या जागा अशा विविध सुविधांचा यात समावेश आहे. निसर्गरम्य परिसर, एनडीए हिल्सचे विहंगम दृश्य आणि शहराशी उत्तमजोडणी यांचा सुरेख मेळ साधण्याचा या प्रकल्पाचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी सांगितले.याप्रसंगी 'वेंकटेश सेरेनिक' प्रकल्पात पहिल्या बुकिंग करणाऱ्या पाचग्राहकांचा उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

### खोसला–रघूंचे 'नैना सावन' गाणे सादर

**नवी दिल्ली :** खोसला– रघू या संगीतजोडीने 'आरजू' ईपीमधील 'नैना सावन' हे तिसरे गाणे सादर केले. यापूर्वी या ईपीमधील 'बेवजह' आणि 'मिले जो सुकून' ही गाणी सादर करण्यात आली होती. 'नैना सावन'मध्ये ओढ, संवेदनशीलता आणि आत्मपरीक्षण या भावना व्यक्त करण्यात आल्या आहेत. भावपूर्ण चाल, संगीतरचना आणि सतारवादन हे या गाण्याचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. गायक–गीतकार पुरुषार्थ जैन यांनी गाण्याचा कोरस गायला आहे. खोसला–रघू यांनी सांगितले की, हे गाणे सुरुवातीला एका नेटफ्लिक्स मालिकेसाठी तयार करण्यात आले होते. 'आरजू' ईपीवर काम करताना ते या संग्रहात समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला. 'बेवजह'साठी तयार केलेला सतारीचा भागही नंतर 'नैना सावन'मध्ये वापरण्यात आला. पुरुषार्थ जैन यांच्या सहभागामुळे गाण्याला नवे परिमाण मिळाले, असे त्यांनी नमूद केले.



महाराष्ट्र एक्झिक्युटर अँड ट्रस्टी कंपनीच्या नेहा दळवी, ॲड. प्रगती वेदपाठक, पुनम नानवानी, प्रणाली खाटपे, मयुरी राऊत